# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०५ मार्च, २०१८ / फाल्गुन १४, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | परिवहन, खारभूमी विकास मंत्री | |
| (३) | कृषी, फलोत्पादन मंत्री | |
| (४) | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री | |
| (५) | पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६९**

---

### महाभूलेख संकेतस्थळावरील ७/१२ उतारा व ई-फेरफारची ऑनलाईन नोंदणी बंद झाल्याबाबत

**(१) * १०४८२७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डिजिटल इंडिया लॅन्ड रेकॉर्डस मॉडर्नायझेशन कार्यक्रमातंर्गत ऑनलाईन सातबारा, ई-फेरफार इत्यादी विविध कामांसाठी राष्ट्रीय माहिती व सूचना केंद्रामार्फत "महाभूलेख" संकेतस्थळ तयार करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील प्रशासनाचे या संकेतस्थळाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे ठाण्यासह शहापूर, मुरबाड, कल्याण, भिवंडी, उल्हासनगर व अंबरनाथ तसेच सांगली जिल्ह्यातील तलाठी व अन्य शासकीय कार्यालयातील सर्व्हरमध्ये दोष निर्माण होऊन ऑनलाईन नोंदणी बंद झाल्याने ऑनलाईन सातबारा मिळण्याचे, असंख्य फेरफार नोंदविण्याचे व सातबारा संगणकीकरणाचे काम बंद झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त संकेतस्थळ पुर्ववत करुन नागरिकांना ऑनलाईन सातबारा व ई-फेरफारची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) डिजिटल इंडिया लॅन्ड रेकॉर्डस मॉडर्नायझेशन प्रोग्रॅम अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या “ई-फेरफार” व संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ या करीता “महाभूलेख” हे संकेतस्थळ राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राकडून तयार करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) स्टेट डाटा सेंटर, मुंबई येथील संसाधने अपूरी पडल्यामुळे तसेच सर्व्हर्सचा वेग मंदावल्याने ऑनलाईन फेरफार नोंदीच्या कामात राज्यातील काही जिल्ह्यात काही प्रमाणात अडचणी आल्या होत्या ही बाब खरी आहे. मात्र, गा.न.नं.७/१२ उताऱ्यांच्या संगणकीकरणाचे व ऑनलाईन फेरफार नोंदीचे काम बंद झाले आहे, अशी वस्तुस्थिती नाही.

सर्व्हर विषयक अडचणींचे निवारण करण्यासाठी दि.१३.१०.२०१७ ते दि.२४.१०.२०१७ या काळात ठाणे जिल्ह्यातील गा.न.नं.७/१२ चा डाटा बीएसएनएल या कंपनीच्या क्लाऊडवर स्थलांतरीत करण्यात आला आहे. डाटा स्थलांतराच्या कालावधीत काही काळ सर्व्हर बंद होते. मात्र, दि.२५.१०.२०१७ पासून बीएसएनएल या कंपनीच्या क्लाऊडवर ठाणे जिल्ह्याचा गा.न.नं.७/१२

उताऱ्यांचा संगणकीकृत डाटा स्थलांतरीत झाल्यानंतर ई-फेरफार विषयक ऑनलाईन व्यवहार सुरु आहेत.

तसेच सांगली जिल्हयातील बहुतांश तालुक्यात ऑनलाईन कामे सुरु असून मिरज व जत तालुक्यामधील काम वेगाने व अचूक होण्यासाठी या दोन तालुक्यांचा डाटा दि.०९.०२.२०१८ पासून लोकल सर्व्हर्स वर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

-----------------

## निळवंडे व चितळवेढे (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूसंपादन रद्द करण्याबाबत

**(२) * १०७१२३ श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निळवंडे व चितळवेढे (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील शेतकऱ्यांची जमीन निळवंडे धरण-१ साठी संपादित करण्यात आली असून सदरचे धरण रद्द झाले असताना व न्यायालयाने आदेश दिले असतानाही या संपादित केलेल्या जमिनीचे भूसंपादन रद्द करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार निळवंडे व चितळवेढे या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे केलेले भूसंपादन रद्द करुन जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याबाबत तसेच न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे. काही निवाडयांतील क्षेत्र वगळण्यात आले असून उर्वरित प्रकरणी कार्यवाही चालू आहे.

(२), (३) व (४) प्रश्नाधीन निळवंडे धरण-१ साठी संपादित जमिनीसंबंधी निवाडानिहाय वेगवेगळया याचिकाकर्त्यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या वेगवेगळया याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे. दरम्यान मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.८.२.२०१८ रोजी दिवाणी अर्ज क्र.२०२८२/२०१७ मध्ये दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडून सरकारी वकील, उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत. सदर अभिप्राय प्राप्त होताच त्याप्रमाणे त्वरित कार्यवाही करण्याची तजवीज जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी ठेवली आहे.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाबाबत

**(३) * १०५११३ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संजय कदम (दापोली), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :**
सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी जमीन संपादन करण्याचे काम अत्यंत संथगतीने सुरु असून महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी जमिनी दिलेल्या कणकवली व कुडाळ शहरातील तसेच एकंदरीत कोकणातील प्रकल्पबाधितांच्या जमिनींचे मूल्यांकन चुकीच्या पद्धतीने करण्यात येत असल्यामुळे फेरमूल्यांकन करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधिंनी मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिले असून प्रकल्पग्रस्तांनी दिनांक १० जानेवारी, २०१८ पासुन आमरण उपोषण करण्याचा इशाराही प्रांत अधिकारी, कणकवली (जि.सिंधुदुर्ग) यांना दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामार्गासाठी अद्यापपर्यंत किती शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत व त्यांना कोणत्या दराने मोबदला देण्यात आला आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पबाधितांच्या जमिनींचे फेरमूल्यांकन करून त्यांना योग्य मोबदला देण्याबाबत तसेच मुंबई-गोवा महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील** : (१) मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरणासाठी जमीन संपादन करण्याचे काम अत्यंत संथगतीने सूरू आहे, हे खरे नाही.

सिंधुदूर्ग जिल्हातील कणकवली नगरपंचायत क्षेत्रातील मौजे कणकवली भूसंपादन प्रस्ताव क्र.६०/२०१४ मधील ७ प्रकल्पग्रस्तांनी उपोषणाबाबत निवेदन दिले होते. हे खरे आहे.

(२) उक्त महामार्गासाठी अद्याप पर्यंत सूमारे ५६,१६३ शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत करण्यात आल्या असून त्यांना राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ मधील तरतूदीस अनुसरून मोबदला देण्यात आला/ येत आहे.

(३) व (४) राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ चे तरतुदीनुसार प्रकल्पग्रस्तांना मोबदला मान्य नसल्यास लवादाकडे अपिल करण्याची तरतुद आहे.

मौजे कणकवली येथील जमिनीचा मोबदला रू. २६३३/- प्रति चौ मी. या दराने देण्यात आलेला असून सदरचा दर मान्य नसल्याने काही खातेदारांनी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग तथा लवाद राष्ट्रीय महामार्ग यांचे न्यायालयात अपिल अर्ज दाखल केलेले आहेत. सदर अपिलावर सुनावणी घेऊन आवश्यक असल्यास उपविभागीय अधिकारी तथा CALA कणकवली यांना फेर मुल्यांकनाचे आदेश पारित करण्यात आलेले आहेत. त्यांचा अहवाल प्राप्त करून घेऊन न्यायनिर्णय देण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग तथा लवाद राष्ट्रीय महामार्ग यांचे स्तरावर सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या इमारतींची दुरुस्ती करुन रिक्त पदे भरण्याबाबत

**(४) * १०९१५३ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यात पशुपालन व्यवसाय मोठ्या प्रमाणावर करण्यात येत असताना येथील सुमारे ९६ हजार ८९० पशुधनाच्या उपचारासाठी फक्त ३५ कर्मचारी उपलब्ध असून ९ पदे रिक्त असल्यामुळे पशुधनाच्या आरोग्यविषयक सेवा मिळत नसल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील पशुवैदयकीय दवाखान्यांच्या इमारती जीर्ण झाल्या असून पावसाळ्यात या इमारतीत गळती होत असल्याचे तसेच दवाखान्यांना संरक्षक भिंतीही नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन पशुधनाच्या तुलनेत आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याबाबत व येथील पशुवैदयकीय दवाखान्यांच्या इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

मुखेड तालुक्यात एकुण १४ पशुवैद्यकीय दवाखान्यांसाठी पशुधन विकास अधिकारी संवर्गातील ८ मंजूर पदांपैकी ७ पदे भरलेली असून, १ पद रिक्त, पशुधन पर्यवेक्षक संवर्गातील १३ मंजूर पदांपैकी १० पदे भरलेली असून फक्त ३ पदे रिक्त, व्रणोपचारक संवर्गातील ७ मंजूर पदांपैकी ५ पदे भरलेली असून, २ पदे रिक्त आणि परिचर संवर्गातील १७ मंजूर पदांपैकी १४ पदे भरलेली असून, ३ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांचा कार्यभार नजिकच्या संस्था प्रमुखांकडे दिलेला असल्याने पशुधनाच्या आरोग्य विषयक सेवा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत.

(२) हे खरे नाही.

मुखेड तालुक्यात एकुण १४ पशुवैद्यकीय दवाखाने असून, त्यापैकी १३ पशुवैद्यकीय दवाखान्यांना स्वत:ची इमारत आहे. पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ चे जाहूर, बा-हाळी, व श्रेणी-२ चे चांडोळा, सेवती, पाळा, राजूरा असे एकुण ०६ पशुवैद्यकीय दवाखान्यांना संरक्षण भिंती आहेत. तसेच पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ जाहुर, मुखेड, बा-हाळी, श्रेणी-२ बेटमोगरा, पाळा, राजूरा या ठिकाणच्या इमारती काही प्रमाणात पावसाळ्यात गळतात. सदरील इमारती जिल्हा परिषद उपकरातून दुरूस्त करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) मुखेड तालुक्यातील पशुवैद्यकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या संस्था प्रमुखांकडे सोपविण्यात आलेला आहे.

नियतकालीक बदल्या-२०१८, पदोन्नती, पशुधन विकास अधिकाऱ्यांची सरळसेवा भरती इत्यादी बाबतची कार्यवाही करताना मुखेड तालुक्यातील उक्त रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही प्राधान्याने करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कारंजा व रमजानपूर (ता.बाळापूर, जि.अकोला) प्रकल्पबाधीतांना भूसंपादनाचा मोबदला देण्याबाबत

**(५) * १०९९६१ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारंजा व रमजानपूर (ता.बाळापूर, जि.अकोला) प्रकल्पाच्या १०८ प्रकल्पबाधीतांच्या न्यायहक्काचे ४५ कोटी रुपये शासनाने भूसंपादन अधिकाऱ्यांकडे वर्ग केले असतानाही संबंधित प्रकल्पबाधीतांना अद्यापपर्यंत मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पबाधीतांना तातडीने मोबदला न दिल्यास प्रकल्पाचे काम थांबविण्याचा व आंदोलन करण्याचा इशारा सदर प्रकल्पबाधीतांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती प्रकल्पबांधीतांना मोबदला देण्याबाबत व विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे. परंतु, प्रकरणात अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार कलम २१ ची कार्यवाही सुरु असून, तद्नंतर नियमानुसार अंतिम निवाडा पारीत करुन, पुढील वाटपाची कार्यवाही करण्यात येईल.

(२) होय, हे खरे आहे परंतु बाधीत भुधारक यांचे आक्षेपावर प्रकरणांत सुनावणी करीता प्रलंबीत असून, तद्नंतर अंतिम निवाडा पारीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रस्तुत विषयामध्ये मा.पालकमंत्री यांचे जनता दरबारात प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने तत्काळ कार्यवाही करणेबाबत भुसंपादन अधिकारी बाळापूर यांना निर्देशीत केले आहे.

(४) अधिनियम २०१३ मधील तरतुदींप्रमाणे कार्यवाही सुरु असल्यामुळे, कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) लागू नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील वैनगंगा नदी पात्रातून होत असलेले अवैध वाळू उत्खनन

**(६) * १०९२१४ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश काशीवार (साकोली), डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील मौजा-आमगाव व मौजा-सावंगी (ता.देसाईगंज) व मौजा-अरसोडा (ता.आरमोरी) येथील वैनगंगा नदी पात्रातील रेती घाटांवरून तसेच गडचिरोली शहरालगतच्या कठाणी नदीपत्रातून मोठ्या प्रमाणात वाळू उत्खनन करून वाहतूक करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त रेतीघाटावरून वाळू तस्करी करणाऱ्या वाळू माफियांवर कारवाई करून वाळू तस्करी न होण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मौजा आमगाव व मौजा सावंगी (ता.देसाईगंज) आणि मौजा अरसोडा (ता.आरमोरी) येथील रेतीघाटांचा लिलाव करुन त्याचा ताबा लिलावधारकास अनुक्रमे दि.०२/१२/२०१७, दि.१७/१०/२०१७ व दि.१३/१०/२०१७ रोजी देण्यात आलेला आहे. तसेच मौजा कठाणी नदीवरील रेतीगटाचा ई-लिलाव करून त्याचा ताबा दि.२९/०१/२०१८ रोजी देण्यात आलेला आहे. सदर ठिकाणावरुन वाळूचे अवैध उत्खनन होत असल्याचे दिसून आले नाही. तथापि, वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी भरारी पथक व पोलीस विभागामार्फत वेळोवेळी तपासणी करण्यात येते. अवैध गौण खनिज

वाहतूकीला आळा घालण्यासाठी बारकोड वाहतूक पासवर युनिक ईनवाईस कोड टाकणे बंधनकारक करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(७) * १०७४३३ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरातील नगर नाका ते महावीर चौक, मुकुंदवाडी चौक ते विमानतळ, दिल्ली दरवाजा ते हर्सुल टी पॉईंट, क्रांती चौक ते रामगिरी सिग्नल, सिडको बसस्थानक ते हर्सुल टी पॉईंट या रस्त्यांचे डांबरीकरण तीन वर्षापूर्वी करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:स्थितीत या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून रस्त्याच्या वरचा पृष्ठभाग उखडून खालचा थर उघडा पडला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्यांचा दोष दायीत्व कालावधी संपला नसताना सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी लोकसहभागातून रस्त्यावरील खड्ड्यात भर टाकून प्याचवर्कचे काम करत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त रस्ते दोष दायीत्व कालावधीच्या आत असल्यामुळे संबंधित ठेकदारकडून रस्त्यांची दुरुस्ती करून घेणे आवश्यक असताना लोकसहभागातून दुरुस्ती करण्याची कारणे काय आहे,
(५) असल्यास, याबाबत चौकशी करुन उक्त रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे न करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. हे खरे आहे.
(२) प्रश्नाधीन रस्त्यावर काही ठिकाणी खड्डे पडल्याचे ऑक्टोबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले होते.

(३) व (४) हे खरे नाही. दोष दायित्व कालावधी मे, २०१७ मध्ये समाप्त झाला होता. सबब सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत खड्डे भरण्यात आले असून सद्य:स्थितीत रस्ते सुस्थितीत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील ग्रीन गोल्ड सीड्स कंपनीच्या बीटी कपाशी बियाण्यांचा साठा जप्त केल्याबाबत

**(८) * १०४९४२ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील ग्रीन गोल्ड सीड्स कंपनीच्या बीटी कपाशी व बीजी-टू बियाण्यांचा १२७९ क्विंटल साठा माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान जप्त करण्यात आला असल्याचे व त्याची किंमत सुमारे २४ कोटी रुपये असून त्यामधील २ लाख ८४ हजार पाकिटे ही मुदत संपलेली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर फौजदारी कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) मे. ग्रीन गोल्ड सिड्स लि. औरंगाबाद ही बी.टी. कापूस बियाणांचे उत्पादन, प्रक्रिया, पॅकींग व विक्री करणारी परवानाधारक कंपनी आहे. सदर कंपनीच्या परवान्यात समाविष्ठ नसलेल्या लिंबेजळगांव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद येथील अनधिकृत गोदामाची दिनांक ०३ डिसेंबर, २०१७ रोजी तपासणी केली असता गोदामात सुमारे २३.०२ कोटी रूपये किंमतीची एकूण २.८४ लाख पाकिटे आढळून आलेली आहेत. यापैकी १.९६ लाख पाकिटांची वैधता मुदत संपलेली होती.

(२) व (३) दिनांक ०३ डिसेंबर, २०१७ रोजी गोदामाच्या तपासणी दरम्यान काढण्यात आलेले नमुने पुढील चाचण्यांसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आलेले आहेत. सदर गोदामातील बियाणे साठ्याला विक्रीबंद आदेश देण्यात आलेले आहेत. सदर गोदाम परवान्यात समाविष्ठ नसतांना बियाणे साठवणूक केल्याप्रकरणी संबंधित उत्पादकाविरूद्ध पोलीस स्टेशन, वाळुंज, औरंगाबाद येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई उपनगरातील वांद्रे ते दहिसर या रस्त्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(९) * १०४७८४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील वांद्रे ते दहिसर या ५४ कि.मी. लांबीच्या राष्ट्रीय द्रुतगती महामार्गाच्या सन २००४-०८ या कालावधीत संयुक्तपणे केलेल्या रस्ता रुंदीकरणाच्या कामात सार्वजनिक बांधकाम विभाग व एमएमआरडीए यांनी रस्त्याची जाडी ४० एमएम ऐवजी २० एमएम ठेवून कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सदरहू रस्त्याचे काम करणाऱ्या सबंधित अधिकारी व कंत्राटदाराविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रश्नाधिन कामाबाबत सन २०१४ मध्ये मा. लोकप्रतिनिधींनी तक्रार केली होती.
(२), (३) व (४) सदर तक्रारीच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सल्लागाराकडून अहवाल घेतला असता सदर कामावर मास्टीक अस्फाल्टची जाडी ४० मी.मी. असल्याचे आढळून आले आहे.

-----------------

## मुलुंड (मुंबई) येथील चौधरी ड्रायव्हिंग स्कुलने बनावट वाहन चालक परवाने बनविल्याबाबत

**(१०) * १०४८५२ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व मुंबईतील शासकीय प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या बनावट सही-शिक्क्यांसह ७०० स्मार्टकार्ड वाहन परवाने मुलुंड (मुंबई) येथील चौधरी ड्रायव्हिंग स्कूलने दिले असल्याची बाब दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास ठाणे पोलीसांच्या निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलुंड (मुंबई) येथील चौधरी ड्रायव्हिंग स्कूलचे सुनिल भीमराज चौधरी यांनी बनावट स्मार्ट कार्ड वाहन परवाने तयार करुन १० ते २० हजार रुपयात व इतर प्रमाणपत्रे ५ ते १० हजार रुपयात दिली असल्याचे ठाणे पोलीसांनी केलेल्या तपासात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे पोलीसांनी मुलुंड येथील चौधरी ड्रायव्हिंग स्कुलवर छापा टाकला असता अनेक बनावट प्रमाणपत्र, प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे सही व शिक्के, लेझर प्रिंटर, कलर प्रिंटर, लॅमिनेशन मशीन व संगणक सापडले असून, आरटीओ, पोलीस व महसूल इत्यादी शासकीय कार्यालयांचे शिक्के तयार करणे, बनावट स्मार्ट कार्ड तयार करणे याचे एक पथक चौधरी यांच्या निवासस्थानी व कार्यालयामध्ये कार्यरत असल्याचे तसेच सदर प्रकरणात परिवहन कार्यालयातील कर्मचारी व अधिकारीही सहभागी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार सदरचे बनावट स्मार्टकार्ड वाहन परवाने रद्द करण्याबाबत व संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) ते (५) मुलुंड येथील चौधरी मोटार ड्रायव्हींग स्कुल या ठिकाणी पोलिस विभागाव्दारे केलेल्या कारवाईत श्री.सुनील भीमराज चौधरी हे आरटीओ, पोलीस व महसूल इत्यादी शासकीय कार्यालयाचे शिक्के, बनावट मोटार ड्रायव्हिंग स्मार्ट कार्ड तयार करीत असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाल्यावरुन दि.१६.०१.२०१८ रोजी श्रीनगर पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे गुन्हा रजि. नं. ०७/२०१८, भा.द.वि. कलम १७१, ४०६, ४२०, ४६४, ४६७, ४६८, ४७१ दाखल करण्यात येवून श्री.सुनील भीमराज चौधरी यांना दि.१६.०१.२०१८ रोजी अटक करण्यात आलेली आहे. चौधरी मोटार ड्रायव्हिंग स्कूलचा परवाना सन २०११ मध्येच रद्द करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस विभागामार्फत अन्वेषणाधिन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भात शेतीचे समुद्राच्या पाण्यामुळे झालेले नुकसान

**(११) * १०५९६० श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केळवणे, पूनाडे व वशेणी (ता.उरण, जि.रायगड) गावातील शेकडो एकर भात शेतीत समुद्राचे पाणी जाऊ नये यासाठी खारभूमी विकास विभागाने बांधलेले बंधारे निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे सदर बंधारे वाहून जाऊन समुद्राचे पाणी शेतात गेल्याने गावातील शेकडो एकर भात शेतीचे नुकसान होऊन जमिनी नापिक झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच अलिबाग, पेण आणि पनवेल (जि.रायगड) तालुक्यातही गत सहा ते सात महिन्यात समुद्र व खाडी संरक्षक बंधारे फुटून हजारो एकर भातशेतीत समुद्राचे खारे पाणी शिरल्याने शेतजमिनी नापीक झाल्या असून अनेक शेतातील भात पिकांचे संपूर्ण नुकसान झाले असतानाही याबाबतची माहिती जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालयातील कृषि अधिकारी आणि पेण येथील खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभागाचे अभिंयता यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये निदर्शनास आले असून खाडी संरक्षक बंधारे फुटल्यामुळे जवळपास ४५०० शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्जेकोट, देवबाग, आचरा या गावातील शेकडो एकर भात शेतीत समुद्राचे पाणी शिरु नये यासाठी खारभूमी विकास विभागाने बांधलेले बंधारे निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे खार बंधारे वारंवार फुटून समुद्राचे पाणी शेतात शिरुन गावातील शेकडो एकर भात शेतीचे नुकसान होऊन जमिनी नापिक झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रायगड व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील खार भुमी बंधाऱ्यांची, नापिक झालेल्या जमिनींची व शेतकऱ्यांच्या नुकसानाची पाहणी शासनाने केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत, या भागात खार बंदिस्तीचे काम तातडीने करण्याबाबत व निकृष्ट दर्जाचे बंधारे बांधणाऱ्या ठेकेदारांवर व या निकृष्ट दर्जाच्या बंधाऱ्यांच्या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या खारभूमी विकास विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.

उरण (जिल्हा रायगड) तालुक्यातील केळवणे, पुनाडे, वशेणी या खाजगी खारभूमी योजना असल्याने खारभूमी विकास विभागाने या योजनांची बांधकामे केलेली नाहीत. सदर योजनांना किनारा नियमन क्षेत्र (CRZ) अंतर्गत अद्याप मान्यता न मिळाल्याने ही कामे हाती घेणे शक्य झालेले नाही. उरण तालुक्यातील मागील ४ वर्षात एकूण १०५७.९२ हेक्टर शेतीचे ४०६९ शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

(२) पेण आणि पनवेल (जिल्हा रायगड) तालुक्यातील मागील सहा ते सात महिन्यात एकूण १६४० शेतकऱ्यांच्या ७८६.९६ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच दिनांक ०४.१२.२०१७ व दिनांक ०५.१२.२०१७ रोजी झालेल्या ओखी वादळामुळे अलिबाग तालुक्यातील भोनंग व मनोरंजन या खारभूमी योजनांतर्गत शेतीचे व रचलेल्या मळण्याचे (भाताचे उडवे) नुकसान झाले आहे.

(३) नाही.

मौजे सर्जेकोट व देवबाग, तालुका मालवण या गावात खारभूमी यंत्रणेमार्फत एकही खारभूमी योजना बांधण्यात आलेली नाही अथवा प्रस्तावित नाही.

मौजे आचरा, तालुका मालवण या गावामध्ये खारभूमी विभागामार्फत एकूण ७ खारभूमी योजना बांधलेल्या असून सर्व योजना सुस्थितीत आहेत व त्याद्वारे एकूण २७२ हेक्टर क्षेत्र संरक्षित केलेले आहे.

(४) होय.

महसूल व कृषी विभागाने संयुक्त पंचनामे केलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

उरण (जिल्हा रायगड) तालुक्यातील केळवणे, पुनाडे, वशेणी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्जेकोट व देवबाग, तालुका मालवण या योजना बृहत आराखडयात समाविष्ट नाहीत. या खाजगी खारभूमी योजना आहेत. सदर योजनांवर शासनामार्फत खर्च करण्यात येत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे विभागातील वाळू टंचाई दूर करण्याबाबत

**(१२) * १०७७५४ श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे विभागातील सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर व पुणे या जिल्हयातील वाळू उपशांवर राष्ट्रीय हरित लवादाने पूर्णत: बंदी घातल्यामुळे बांधकामाकरीता वाळूची टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्हयात वाळू अभावी शासकीय योजनेतील घरकुले व शासनाची निरनिराळी विकास कामे बंद पडली असल्याने त्यासाठी शासनाने वाळू उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खानापूर, आटपाडी व कडेगांव (जि.सांगली) तालुक्यात वाळू टंचाईमुळे बांधकाम व्यवसाय प्रभावित होऊन शेकडो कामगारांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे तसेच शेकडो बांधकामे ठप्प झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार पुणे विभागातील वाळू उपशावरील बंदी उठवून व वाळू घाटांचे लिलाव करून वाळूची टंचाई दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मा.हरित न्यायाधिकरणाने वाळू उपशावर पूर्णत: बंदी घातल्याची बाब खरी नाही. तथापि, मा.हरित न्यायाधिकरणाने दि.३०/०५/२०१७ च्या आदेशान्वये पाण्याखालील वाळूचे यांत्रिक साधनांच्या सहाय्याने उत्खनन करण्यास प्रतिबंध केला आहे.

पुणे विभागातील पाण्याखालील वाळूचे यांत्रिक साधनांच्या सहाय्याने उत्खनन करता येत नसल्याने काही प्रमाणात वाळूच्या उपलब्धतेमध्ये कमी निर्माण झाल्याचे दिसून आले आहे.

(२) शासकीय विकासकामांसाठी वाळू उपलब्ध करुन देण्याची मागणी दि.२.१.२०१८ रोजी झालेल्या सोलापूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत लोकप्रतिनिधींनी केली आहे.

(३) सांगली जिल्ह्यात वाळू व्यावसायिक अन्य ठिकाणाहून वाळू उपलब्ध करुन विक्री करीत असल्याने तसेच कृत्रिम वाळूचा वापर बांधकामासाठी होत असल्याने बांधकामे ठप्प झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) व (५) दिनांक ३ जानेवारी, २०१८ च्या सुधारित वाळू / रेती निर्गती धोरणातील तरतूदींच्या अनुषंगाने वाळू गटांचे लिलाव करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोणार, देऊळगावराजा व सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील अवैध वाळू उपशाबाबत

**(१३) * १०६४६२ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यात अनेक ठिकाणी वाहनांच्या क्षमतेपेक्षा जास्त रेती वाहतूक होत असून या अवैध रेती वाहतुकीमुळे शासनाच्या लाखो रुपयांच्या महसूलाचे नुकसान होत असल्याचे तसेच लोणार शहरात अनेक ठिकाणी अनेक महिन्यांपासून शेकडो ब्रास रेतीचा अवैध साठा करण्यात आला असून या साठ्याचा मंडळ अधिकारी यांनी पंचनामा करुन २०० ब्रास रेतीचा साठा असल्याची नोंद केली असून प्रत्यक्षात तेथे ४०० ब्रासपेक्षा जास्त रेती साठा असल्याचे व त्यावर महसूल विभागाकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच निमगाव गुरु (ता.देऊळगावराजा, जि.बुलढाणा) येथे बेकायदा रेती उपसा करणाऱ्या १५ वाहनांवर दिनांक ६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास तहसिलदार, देऊळगावराजा यांनी कारवाई केली असून कारवाईत जप्त करण्यात आलेले टिप्पर दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी वा

त्यासुमारास तहसिल कार्यालयाच्या गेटचे कुलूप तोडून पळवून नेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील खडकपूर्णा नदी व अन्य नद्यांमधून रेतीचे अवैधरित्या उत्खनन करण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार लोणार तालुक्यात वाहने क्षमतेपेक्षा जास्त भरून रेती वाहतूक करणाऱ्या व रेतीची अवैध साठवणूक करणाऱ्या कंत्राटदारावर, वाळू चौकशीचा चुकीचा अहवाल देणाऱ्या मंडळ अधिकाऱ्यावर, निमगाव गुरु येथे अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाहनावर तसेच तहसील कार्यालयातून टिप्पर पळवून नेणाऱ्या संबंधितावर कारवाई करुन सिंदखेडराजा तालुक्यात अवैध रेती उपसा करणाऱ्या रेती माफियांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) दि.१/४/२०१७ ते दि.३१/०१/२०१८ या कालावधीमध्ये लोणार तालुक्यात क्षमतेपेक्षा जास्त व अवैध वाळू वाहतूक करण्याची ५५ प्रकरणे निदर्शनास आली असून या पोटी रु.१३,८५,१००/- इतका दंड संबंधितांकडून वसूल करण्यात आला आहे.

लोणार शहरात अनेक ठिकाणी रेतीचा अवैध साठा केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. मात्र एका प्रकरणात तलाठी यांनी २०० ब्रास वाळूचा पंचनामा केला होता. चौकशीअंती सदर वाळूसाठा वैध असल्याचे निष्पन्न झाले आहे.

डिसेंबर २०१७ मध्ये देऊळगाव राजा तालुक्यातील निमगाव गुरु येथील खडकपूर्णा नदीपात्रातून अवैध वाळू वाहतुकीच्या प्रकरणात अटकावलेल्या वाहनांपैकी एक वाहन पळविल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदर वाहनाच्या मालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर वाहन पुन्हा ताब्यात घेण्यात आले आहे.

सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील खडकपूर्णा व अन्य नद्यांमधून वाळूचे अवैध उत्खनन होत असल्याची बाब डिसेंबर, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली नाही.

दि.१/४/२०१७ ते दि.३१/१/२०१८ या कालावधीत बुलढाणा जिल्ह्यामध्ये अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीच्या ७४६ प्रकरणांमध्ये दंडात्मक कारवाई करुन रक्कम रु.१,३९,५६,११५/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच ५ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केसरी - दाणोली - फणसवडे - चौकुळ - नेनेवाडी (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) या रस्त्यास मंजुरी देण्याबाबत

**(१४) * ११२४६३ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबोली घाट (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) मार्गावर दरवर्षीच्या पावसाळ्यात वारंवार दरडी कोसळत असल्यामुळे घाट रस्ता वाहतुकीसाठी अनेक दिवस बंद ठेवण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घाट मार्गाला पर्याय म्हणून केसरी-दाणोली-फणसवडे-चौकुळ-नेनेवाडी असा १० कि.मी. लांबीचा नविन रस्ता तयार करण्याबाबतची मागणी परिसरातील ग्रामस्थांनी गत २० वर्षापासून सातत्याने मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरवर्षीच्या रस्ते आराखडयात या पर्यायी मार्गाचा समावेश करण्यात येत असतानाही सदरहू पर्यायी मार्गास मंजूरी देण्यात आली नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून आंबोली घाट मार्गाला पर्यायी असणाऱ्या उक्त रस्त्यास मंजूरी देऊन तातडीने रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३), (४) व (५) आंबोली घाटातील रस्त्यासाठी पर्यायी रस्ता म्हणून दाणोली-केसरी-फणसवडे-नेनेवाडी चौकुळ रस्ता प्रजिमा ६० चा वापर करण्याचे नियोजन आहे. या रस्त्याच्या कि.मी. ९/४०० ते कि.मी. १९/४०० या १० कि.मी. लांबीत रस्ता अस्तित्वात नाही. या लांबीतील रस्त्याच्या बांधकामासाठी आवश्यक जमिनीचे संपादन करण्याचे काम प्रगतीत आहे.

भूसंपादन झाल्यावर या लांबीत रस्त्याचे बांधकाम व इतर लांबीतील रस्त्याची सुधारणा करण्याची कामे मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## कांद्री-फुटाळा (ता.मोहाडी, जि.भंडारा) या रस्त्यासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(१५) * १०७९८८ श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा फुटाळा (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील कांद्री-फुटाळा या रस्त्याच्या बांधकामाकरिता संपादित करण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला सन १९८७ पासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शेतकऱ्यांना तातडीने मोबदला देण्यासाठी निधी मागणीचे पत्र कार्यकरी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भंडारा यांनी दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१७ रोजी शासनाकडे दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने या प्रकरणी निधी उपलब्ध करून शेतकऱ्यांना तातडीने मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे ही खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी भुसंपादनाबाबत जमिनीची संयुक्त मोजणी करण्यात येऊन, सविस्तर भुसंपादन प्रस्ताव भुसंपादन अधिकारी, भंडारा यांची मंजूरी प्राप्त झाल्यावर निधीबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर - कोल्हार या रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीच्या कामाबाबत

**(१६) * ११००८४ श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर - कोल्हार या रस्त्याचे देखभाल दुरुस्तीचे काम उद्योजक करीत नसल्यामुळे संबंधित कार्यकारी अभियंता, अधिक्षक अभियंता, मुख्य अभियंता यांनी या रस्त्यावरील टोलनाका तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित उद्योजकामार्फत वरील रस्त्याची देखभाल दुरुस्ती न करताही शासनाने या टोलनाक्यावर पथकर चालू करण्याची परवानगी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त रस्त्याची देखभाल दुरुस्ती न करता टोल वसुली करणाऱ्या उद्योजकावर कारवाई करून टोल वसुली बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) हे अंशतः खरे आहे.

उद्योजक नुतनीकरणाचे काम करीत नसल्याने मागील वर्षी शासनाने पथकर वसुली बंद केली होती. त्याविरुध्द उद्योजकाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केली होती. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उद्योजकास रस्त्याचे नुतनीकरण दि.३१.०३.२०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देऊन पथकर वसूली सुरु ठेऊन सदर रक्कम Escrow Account मध्ये जमा करण्यात येत आहे.

(३) अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियत्रंक मंडळ, नाशिक यांच्या मार्फत कामाची तपासणी करण्यात आली आहे.

(४) रस्त्याचे नुतनीकरणाचे काम सा.बां.विभागामार्फत स्वंतत्र निविदा मागवून उद्योजकाच्या जबाबदारीवर व खर्चाने (Risk & Cost) करून त्यासाठी लागणारी खर्चाची रक्कम उद्योजकास कार, जीप व हलकी वाहने तसेच एस.टी. व स्कूल बसेस यांना पथकरातून सूट दिल्याने शासनाकडून देय असणाऱ्या रक्कमेतून वसुली करण्याची व दैनंदिन पथकर वसुलीची रक्कम Escrow Account मध्ये जमा करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील स्वयंचलित हवामान केंद्र सुरु करण्याबाबत

**(१७) * १०६४२३ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.रणजीत कांबळे (देवळी), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना हवामानाची अचुक माहिती मिळण्याकरीता सहा महिण्यापूर्वी राज्यातील २ हजार ६५ महसूल मंडळामध्ये स्वयंचलित हवामान केंद्र

उभारण्यात आले असुन सदर हवामान केंद्राचे उद्घाटन झाले नसल्याने एकाही केंद्रावरुन शेतकऱ्यांना हवामानाविषयी माहिती मिळत नसल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्हयात ८९ केंद्र उभारण्यात आली असुन सदर केंद्रही अद्यापी सुरु करण्यात आली नसल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांना या स्वयंचलित हवामान केंद्रांचा लाभ मिळण्यासाठी सदरची केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) नाही.

दि.०८ मार्च, २०१७ रोजी राज्यातील प्रत्येक महसूल मंडळामध्ये सार्वजनिक - खाजगी भागीदारीतून स्वयंचलित हवामान केंद्र स्थापन करण्यास (महावेध प्रकल्पास) मंजूरी दिली असून स्कायमेट वेदर सर्व्हिसेस प्रा.लि यांची सेवा पुरवठादार संस्था म्हणुन नियुक्ती केली आहे. या प्रकल्पाचे भूमीपूजन व उद्घाटन माहे, एप्रिल-२०१७ मध्ये पार पडलेले आहे.

दि.१६ फेब्रुवारी, २०१८ अखेर २०६५ पैकी २०५७ महसुल मंडळामध्ये स्वयंचलित हवामान केंद्राची उभारणी पुर्ण झाली असून सदर केंद्र कार्यान्वित झालेले आहेत व त्याव्दारे प्रत्येक महसूल मंडळातील तापमान, पर्जन्यमान, सापेक्ष आर्द्रता, वाऱ्याचा वेग आणि दिशा या हवामान विषयक घटकाची दर १० मिनीटांनी Real Time माहिती उपलब्ध होत आहे. यामध्ये अमरावती जिल्हयातील ८९ महसुल मंडळांचा देखील समावेश आहे.

(३) राज्यातील २०६५ महसुल मंडळापैकी २०५७ महसुल मंडळामध्ये स्वयंचलित हवामान केंद्राची उभारणीचे काम पुर्ण झाले असुन या केंद्रावरुन हवामान विषयक माहिती उपलब्ध होत आहे. सदर माहिती नियमितपणे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या कार्यालयांना ऑनलाईन पोर्टलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सद्यस्थितीत, या माहितीचा हवामान आधारीत फळ पिक विमा योजना, प्रधानमंत्री फसल बिमा योजनेच्या

कामाकरिता उपयोग करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, सदर माहिती आधारे शेतकऱ्यांना भविष्यात कृषि हवामान सल्ला व मार्गदर्शन तसेच अन्य मुल्यवर्धीत सुविधा कशाप्रकारे उपलब्ध करुन देता येईल याचे नियोजन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिरुर व आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१८) * १०९७८७ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर व आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील कान्हूर-मेसाई-मांदळवाडी, तळेघर-भीमाशंकर, भोरवाडी-मंचर, कळंब-साकोरे-चास व कळंब ते लौकी (ता.आंबेगाव) या रस्त्यावर मोठया प्रमाणात खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्ते वाहतुकीसाठी निरुपयोगी झाल्याने नागरिकांना तसेच वाहन चालकांना प्रवास करणे गैरसोयीचे झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यांची पावसाळयापूर्वी तातडीने दुरुस्ती करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हयाचे मा.पालकमंत्री तसेच मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शिरुर व आंबेगाव तालुक्यातील उक्त रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशंत खरे आहे.

प्रश्नांकित रस्त्यांपैकी तळेघर-भिमाशंकर रस्ता रा.मा. ११२ व वकळंब-साकोरे रस्ता प्रजिमा १३ सा.बां.विभागाच्या अखत्यारित आहेत. कान्हूर - मेसाई - मांदळवाडी ग्रा.मा.१२४ साकोरी ते कडेवाडी ग्रा.मा.७ जि.प.पुणे यांच्या अखत्यारित, भोरवाडी - मंचर रस्ता रा.म. ५० केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे. या रस्त्यांच्या काही भागात रस्ता क्षतिग्रस्त झाला होता. तथापि रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत चालू आहे.

(२) होय.

(३), (४) व (५) सा.बां.विभागाच्या अखत्यारीतील रस्त्यावरील खड्डे भरुन रस्ते वाहतुकीस सुरळीत ठेवण्यात आले आहे. जि.प. पुणे यांच्या अखत्यारितील रस्त्यावर कमी वेगाने वाहतुक होत आहे. राष्ट्रीय महामार्ग असलेला रस्ता केंद्र शासनाच्या अखत्यारित असून त्यांच्या मार्फत सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

सर्व रस्त्यावरील काही लांबीत करावयाची आवश्यक कामे मंजूरी निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार संबंधित यंत्रणामार्फत हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाच्या ठाणे जिल्हयाच्या जिल्हा व्यवस्थापकांनी केलेला गैरव्यवहार

**(१९) * १०६५५५ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाच्या लेखापरिक्षकांनी निलंबित तत्कालिन जिल्हा व्यवस्थापक अरविंद तपासे यांच्या विरोधात सन २०१४ ते २०१६ या कालावधीत ४२६ क्विंटल बियाण्यांचा अपहार करून रुपये १४,९०,५९८ इतक्या रक्कमेचा गैरव्यवहार केल्याची तक्रार वागळे इस्टेट

पोलिस ठाण्यात दिनांक ८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला तसेच पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाचे निलंबित तत्कालिन जिल्हा व्यवस्थापक, ठाणे यांनी आर्थिक वर्ष २०१४-१५ ते २०१५-१६मध्ये एकुण ७५४ क्विंटल भात बियाण्यांबाबत, तसेच, अन्य प्रकारे मिळून एकुण रु. ५९ लक्ष रकमेचा गैरव्यवहार केल्याचे आढळून आल्याने त्यांच्या विरुध्द वागळे ईस्टेट, पोलीस ठाणे (ठाणे शहर) येथे दिनांक ०७.०१.२०१८ रोजी फौजदारी गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे हे खरे आहे.

(२) महामंडळातील अंकेक्षण विभागाकडून सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आलेली आहे.

(३) चौकशीमध्ये उपविभागीय कार्यालय, ठाणे येथे आर्थिक वर्ष २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता व गैरव्यवहार झाल्याची बाब आढळून आली. तसेच, भात पायाभूत / प्रमाणित बियाणेचा मोठया प्रमाणावरील साठा गहाळ झाल्याची बाब निदर्शनास आली. याबाबत श्री. तपासे निलंबित तत्कालीन जिल्हा व्यवस्थापक, ठाणे महाबीज यांचे विरुध्द वागळे इस्टेट पोलीस ठाणे, (ठाणे शहर) येथे भा.दं.वि. कलम ४०९ खाली फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून श्री. ए.एल. तपासे व श्री. एस.एस. पारधे, सहायक क्षेत्र अधिकारी, महाबीज यांना दिनांक २०.८.२०१६ पासून निलंबित करण्यात आलेले आहे. त्यांचे विरुध्द म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम १२ अन्वये संयुक्तरित्या विभागीय चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जुनोना, गुडेगाव व येनोळा (ता.पवनी, जि.भंडारा) येथील रेतीघाटावरून होत असलेले अवैध रेती उत्खनन

**(२०) * १०८६५२ श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुनोना, गुडेगाव व येनोळा (ता.पवनी, जि.भंडारा) येथील रेतीघाटावरून पर्यावरण विषयक तरतुदीचे पालन न करता जेसीपी, पोकलॅन्ड मशिनद्वारे अहोरात्र अवैध रेती उत्खनन करून वाहतूक करण्यात येत असल्यामुळे शासनाच्या कोटयवधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान होत असल्याबाबतची तक्रार दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी स्थानिक लोकप्रतिनीधींनी जिल्हाधिकारी भंडारा यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रेतीघाटांवर सुधारीत वाळू धोरणानुसार मोक्याच्या ठिकाणी चेक नाके, सिसिटीव्ही कॅमेरे (वाळू गटाच्या ठिकाणी) बसविण्यात न आल्याचे तसेच याकडे महसूल विभागाचे दुर्लक्ष झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर रेती घाटावरून अवैध रेती वाहतूक करणाऱ्या व नवीन वाळू धोरणातील तरतुदींचा अवलंब न करणाऱ्या कंत्राटदाराविरूध्द तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी तक्रार जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडे करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) पवनी तालुक्यातील मौजा जुनोना येथील रेतीघाट लिलावात गेला असून करारनाम्यातील अटी व शर्तीप्रमाणे लिलावधारक मानवी पध्दतीने रेती उत्खनन करुन ट्रॅक्टरद्वारे रेतीची उचल करतात. सदर रेतीघाटावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. सदर रेतीसाठ्याची, रेती वाहतूक पासेस, रेतीघाटावरील असलेले रजिस्टर, ऑनलाईन तपासणी दररोज तलाठी यांचेकडून करण्यात येते. तसेच महिन्यातून दोन वेळा मंडळ

अधिकारी तर प्रत्येक महिन्याला तहसीलदार यांचेकडून प्रत्यक्ष रेतीघाट व रेतीसाठ्याची पाहणी केली जाते.

मौजे गुडेगाव व मौजा येनोळा हे रेतीघाट लिलावात गेले आहेत. तथापि, लिलावधारकांनी सदर रेतीघाटाच्या लिलावाची संपूर्ण रक्कम भरली नसल्यामुळे लिलावधारकांना उक्त रेतीघाटाचा करारनामा करुन ताबा देण्यात आलेला नाही. उक्त रेतीघाटातून अवैध उत्खनन केल्याचे निदर्शनास आले नाही.

दि.१/४/२०१७ ते दि.३१/१/२०१८ या कालावधीत भंडारा जिल्हयामध्ये अवैध वाळू उत्खनन/वाहतूकीच्या ८१० प्रकरणांमध्ये दंडात्मक कारवाई करुन रक्कम रु.४,०३,९५,२६५/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच ०७ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे दाभाडी (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथे बनावट कागदपत्रांच्या आधारे प्लॉटची विक्री केल्याबाबत

**(२१) * १०६९३५ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दाभाडी (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथील गट नं. १५२७/१ मधील भूखंड धारकांनी बनावट कागदपत्रे तसेच खोट्या माहितीच्या आधारे सहकब्जेदाराची स्वमालकीची १ हजार २०० चौ. मी. जागा हडप केल्याचे तसेच मंजूर केलेला तात्पुरता अभिन्यास व बिनशेती आदेशातील २७ प्लॉटची विक्री करुन अडीच कोटीहून अधिक रकमेची फसवणूक केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभिन्यास मंजुर होवून १३ वर्षे होऊनही अटी व शर्तींच्या अधीन राहून भूखंड विकसित करण्यात आलेला नसल्याचे तसेच मंजुर अभिन्यासातील ६ व ९ मीटर रस्त्याचे क्षेत्र प्रत्यक्षात १ हजार ६४० चौ.मी. असताना भूखंडधारकांनी ते क्षेत्र अवघे ३२६ चौ. मी. असल्याचे दर्शवून तसा सातबारा उतारा तयार करुन अपहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मौजे दाभाडी (ता.मालेगांव जि.नाशिक) येथील गट नं.१५२७/१ क्षेत्र १.०० हेक्टर या गटाचा श्री.सुभाष आसाराम चोरडीया व इतर यांनी अभिन्यास मंजूर करून घेतला होता. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, मालेगांव यांनी सदर क्षेत्रास रहिवास प्रयोजनासाठी तात्पुरत्या रेखांकनास दि.२९.०४.२०११ च्या आदेशान्वये अकृषिक परवानगी दिली. गट नं.१५२७/२ क्षेत्र ०.१२ आर हे क्षेत्र श्री. जयेश शांताराम वाघ यांच्या मालकीचे असून सदर गटाला अद्याप बिनशेती परवानगी देण्यात आलेली नाही. मात्र गट नं.१५२७/१ व १५२७/२ यांचे क्षेत्र लगत असल्याने अभिन्यास मंजूर करताना १५२७/२ चे क्षेत्र अभिन्यासामध्ये दर्शविण्यात आलेले आहे. श्री. चोरडीया यांनी त्यांच्या १ हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत मात्र अंतिम अभिन्यास/बिनशेती आदेश प्राप्त करून घेण्यापूर्वीच तात्पुरत्या अभिन्यासानुसार भूखंडांची विक्री केलेली आहे.
(२) सहाय्यक संचालक, नगर रचना, नाशिक यांनी दि.८.०४.२००४ रोजी मंजूर केलेल्या अभिन्यासानुसार सर्व्हीस रोड खालील क्षेत्र १४५०.०० चौ.मी., ॲमिनिटी स्पेसचे क्षेत्र १०२७.०४ चौ.मी व रस्त्याखालील क्षेत्र ३२६.३५ चौ.मी. याप्रमाणे असून त्यानुसार फेरफार क्र.१३८७१,दि.२९.०४.२०११ अन्वये तलाठी यांनी गाव न.नं. ७/१२ उतारे तयार केले आहेत.
(३) व (४) सदर प्रकरणी अंतिम अभिन्यास मंजूरीचे आदेश प्राप्त करून घेण्यापूर्वीच तात्पुरत्या अभिन्यासानुसार भूखंड विक्री करण्यात आलेली असल्याने तसेच भूखंडाचे गाव न.नं ७/१२ उतारे तयार करण्यात आले असल्याने उपविभागीय अधिकारी, मालेगांव उपविभाग, मालेगांव यांच्या आदेश दि.११.१०.२०१७ अनुसार सदर क्षेत्राचा दि.२९.०४.२०११ चा तात्पुरता बिनशेती आदेश रद्द करण्यात आला असून फेरफार नोंद क्र.१३८७१ रद्द करण्यात आली आहे. तसेच प्लॉट खरेदी विक्री व्यवहाराबाबतच्या नोंदींचा

अंमल इतर हक्कात घेणेबाबत व दोषी असणाऱ्या तलाठी व मंडळ अधिकारी यांच्याविरूद्ध शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत आदेश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर विभागातील वाळू घाटांचे लिलाव न झाल्याने वाळू टंचाई निर्माण झाल्याबाबत

**(२२) * १०६१६७ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य पर्यावरण मुल्यांकन समितीने वाळू उपशाबाबत कठोर निकषांचा अवलंब केला असून त्यामुळे या वर्षी नागपूर विभागाच्या ६ जिल्हयातील रेती घाटांचा लिलाव दामदुपटीने करण्यात आल्याने अर्ध्याच रेतीघाटांचा लिलाव झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विभागाच्या सर्व जिल्हयातील वाळू घाटांचे लिलाव न झाल्यामुळे कंत्राटधारकांनी कृत्रीम रेती टंचाई निर्माण केली असून त्यामुळे सामान्य नागरीकांना रेती खरेदीसाठी अधिक पैसे मोजावे लागत असल्याने घर बांधणी व्यवसाय अडचनीत आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार राज्य पर्यावरण मुल्यांकन समितीने वाळू उपशाबाबत केलेले निकष शिथिल करण्याबाबत व नागपूर विभागातील सर्व रेती घाटांचा लिलाव करून वाळूची टंचाई दूर करण्याबाबत तसेच वाळूची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या वाळू कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) सन २०१७-१८ च्या वाळू/ रेतीघाट लिलावाकरिता नागपूर विभागातील नागपूर जिल्ह्यात निश्चित करण्यात आलेल्या २१ रेतीघाटांचे अंतिम सर्वेक्षण न करता लिलाव करण्यात आल्याने तसेच जिल्हा खाणकाम आराखडा न करता पर्यावरण अनुमती मंजूर केल्याने मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र.६१६३/२०१७ व ६१४७/२०१७ मध्ये दि.२/२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये लिलाव प्रक्रिया रद्द केली आहे. चंद्रपूर जिल्ह्यात एकूण ५८ रेतीघाट, वर्धा जिल्ह्यात १० रेतीघाट, गोंदिया जिल्ह्यात २६ रेतीघाट, भंडारा जिल्ह्यात ३० रेतीघाट, गडचिरोली जिल्ह्यात ५६ रेतीघाट लिलावात गेले होते. मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल रिट याचिका क्र.८१५१/२०१७, ८०४१/२०१७ व ८१३९/२०१७ मध्ये राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये दि.२१/१२/२०१७ च्या आदेशान्वये पर्यावरण आघात मुल्यांकन व पर्यावरणीय व्यवस्थापन योजना नसलेल्या रेतीघाटांच्या लिलावास स्थगिती दिल्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यात ६५, भंडारा जिल्ह्यात द्वितीय फेरीतील सर्व रेतीघाट, गडचिरोली जिल्ह्यातील १९ रेतीघाट यांचे लिलाव होऊ शकले नाहीत. त्यामुळे भंडारा जिल्ह्यामध्ये काही प्रमाणात रेतीटंचाई निर्माण होऊन नागरिकांना मागील ३ वर्षाच्या तुलनेत जास्त किंमत मोजावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे. आता मा.उच्च न्यायालयाने दि.२१/०२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये सदर याचिका खारीज केल्याने नवीन वाळू निर्गती धोरण दि.३/१/२०१८ मधील तरतूदीनुसार राज्यातील वाळू गटाची प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाकण-पाली-खोपोली (जि.रायगड) या राज्यमार्गासाठी संपादित केलेल्या जमिनीच्या मोबदल्याबाबत

**(२३) * १०५०३४ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाकण-पाली-खोपोली (जि.रायगड) या राज्यमार्गाच्या रुंदीकरणामध्ये अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमीनी गेल्या असून अनेक लहान-मोठ्या उद्योगधंद्याचे नुकसान झाले असल्याने नुकसानग्रस्तांना योग्य तो मोबदला देण्यात यावा अन्यथा बेमुदत उपोषण करण्यात येईल असा इशारा सुधागड तालुका शेतकरी समन्वय संघर्ष समितीने तहसिलदार, पाली यांना दिनांक १७ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गाचे सुरु असलेले रुंदीकरणाचे काम धोकादायक व असुरक्षितरित्या होत असल्याचेही माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त मार्गासाठी शेतकरी व लहान-मोठ्या उद्योजकांच्या संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा योग्य मोबदला देण्याबाबत तसेच रस्त्याचे काम सुरक्षितरीत्या करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर रस्ता हा रोहा, पाली व खालापूर या ३ तालुक्यामधून जात असून भूमी अभिलेख कार्यालयाकडून प्रमाणित मोजणी नकाशानुसार सर्वसाधारणपणे ३० मी. रुंदीपर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाची हद्द असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने आस्तित्वातील रस्त्याच्या हद्दीचे सीमांकन करणेसाठी रु. २३.९८ लक्ष मोजणी शुल्क पाली येथील भूमी अभिलेख कार्यालयामध्ये जमा करण्यात आले आहे. तसेच तहसिल कार्यालयातर्फे गावांमध्ये कँप घेऊन मालकी हक्कांची दुरुस्तीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) सद्यस्थितीत शासनाच्या मालकीच्या रुंदीतच प्रकल्पाचे बांधकाम करण्यात येत असून भौमितिक / अभियांत्रिकी सुधारणा, बस थांबा, पार्कींग सुविधा इ. बाबींसाठी लागणाऱ्या सुमारे ५ हे. अतिरीक्त जागेसाठी

भूसंपादनाचा प्रस्ताव तयार करण्याचे काम प्रगती पथावर असून त्या संदर्भात राष्ट्रीय महामार्ग १९५६ नुसार मावेजा वाटपासह भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण केल्यानंतरच सदर ठिकाणी काम हाती घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) खाडीतून अनधिकृत रेती उपसा होत असल्याबाबत

**(२४) * ११०१०४ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) खाडीतून यंत्राच्या सहाय्याने अनधिकृतपणे रेती उपसा केला जात असल्याचे तसेच यामुळे किनारपट्टी खचून किनाऱ्याची धूप होत असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या रेती उपशाकडे संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असून या अवैध रेती उपशाविरोधात कोणतीही कारवाई करण्यात आली नाही आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार सदर ठिकाणी अनधिकृत रेती उपसा करण्या-या रेती माफियांवर तसेच त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही. तथापि, दैनिक लोकमत या वृत्तपत्रामध्ये दि.१३/१/२०१८ रोजी अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती. या बातमीच्या अनुषंगाने तहसीलदार, वसई यांचे अधिनस्त मंडळ अधिकारी, वसई व तलाठी, मालोंडे यांनी नमुद ठिकाणी पाहणी केली असता त्याठिकाणी अनधिकृत रेती उत्खनन केल्याचे त्यांना आढळून आलेले नाही.

(२), (३) व (४) दि.१/४/२०१७ ते दि.३१/१/२०१८ या कालावधीत पालघर जिल्ह्यामध्ये अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीच्या ४८८ प्रकरणांमध्ये दंडात्मक कारवाई करुन रक्कम रु.२,२१,१६,७६२/- इतका दंड वसूल करण्यात आला असून ३३ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच अवैध वाहतूकीसाठी वापरण्यात आलेली ४३ वाहने, ३९ डिझेल पंप, ७५ डिझेल इंजिन, २२ सक्शन पंप, ९ फायबर बोटी, १० बोटी, १२ लोखंडी पाईप, २५ रेती चाळण्या व १ जे.सी.बी. हे साहीत्य जप्त करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हारुर-गरजगांव (ता.आजरा, जि.कोल्हापूर) दरम्यान हिरण्यकेशी नदीवर पूल बांधण्याबाबत

**(२५) * १०७१४९ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हारुर-गरजगांव (ता.आजरा, जि.कोल्हापूर) दरम्यान हिरण्यकेशी नदीवर असलेला कोल्हापूर बंधारा कमकुवत झाल्याने अवजड वाहतुकीस धोकादायक झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कोल्हापूर बंधाऱ्यास समांतर पुल बांधण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिनांक २८ जुलै, २०१७ व २४ ऑगस्ट, २०१७ रोजी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार व लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार उक्त ठिकाणी पुल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रस्तूत पूलाचे काम निकष, मंजूरी व निधीच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिवडाव-थळकरवाडी, तळीनजीक (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) आग लागून झालेले नुकसान

**(२६) * १०५६०१ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कनेडी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) परिसरातील शिवडाव - थळकरवाडी, तळीनजीक दिनांक ०१ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास नैसर्गिक रित्या लागलेल्या भीषण आगीत २४ एकरांवरील काजू कलमांची बाग व आंबा कलमे तसेच सागाची झाडे जळून खाक होऊन बागायतदारांचे ५७ लाख २१ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच चिपी, परुळे - कुशेवाडा (ता.वेंगुर्ले, जि.सिंधुदूर्ग) व कवठी, चेंदवण माळरानावर (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) दिनांक ०३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास नैसर्गिक वणव्यामुळे लागलेल्या आगीच्या तांडवात ३ शेत नांगर, आंबा व काजुच्या बागांसह गवताच्या गंजी जळून करोडो रुपयांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नैसर्गिक रित्या लागलेल्या आगीत झालेल्या नुकसानीचे पंचनामे शासनाने केले आहेत काय,

(४) असल्यास, त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकरी व बागायतदारांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

आपदग्रस्त श्री. विजय गावकर यांनी त्यांच्या जबाबात अज्ञात इसमाने मुद्दाम आग लावल्याचे नमूद केले आहे.

(२) जानेवारी महिन्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यातील चिपी विमानतळ नजीक आग लागून ७ बागायतदारांच्या एकूण १००६ आंबा व काजू कलमांचे सुमारे रु १०,१३,०००/- एवढे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले.

तथापि, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यातील कवठी, चेंदवण माळरानावर दिनांक ०३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास नैसर्गिक वणव्यामुळे लागलेल्या आगीच्या तांडवात ३ शेत नांगर, आंबा काजुच्या बागांसह गवताच्या गंजी जळून करोडो रुपयांचे नुकसान झाले असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) होय.

(४) शासन निर्णय दिनांक १३.०५.२०१५ अन्वये शेतातील पिकांना आग लागल्याची बाब नैसर्गिक आपत्तीमध्ये येत नसल्याने सदर आगीत नुकसान झालेल्या आपदग्रस्तांना मदत देण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे ओखी चक्रीवादळामुळे झालेले नुकसान

**(२७) * १०६०२० श्री.अनिल कदम (निफाड), श्री.छगन भुजबळ (येवला), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील १ हजार ५०० शेतकऱ्यांच्या तब्बल १३०० हेक्टर क्षेत्रातील पिकांचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान आलेल्या ओखी चक्रीवादळामुळे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा प्रशासनाने नुकसानीचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना आर्थिक भरपाई देण्यासाठी २ कोटी ३३ लक्ष रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूर करुन शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.
(३) राज्यात दिनांक ४ ते ६ डिसेंबर, २०१७ या कालावधीत ओखी चक्रीवादळामुळे व त्यामुळे आलेल्या अवेळी पावसामुळे शेतीपिके / फळपिके यांचे झालेल्या नुकसानीबाबत संयुक्त पंचनामे करुन सविस्तर प्रस्ताव पाठविण्याबाबतच्या सूचना सर्व क्षेत्रिय कार्यालयांना शासनपत्र दिनांक ७ डिसेंबर, २०१७ अन्वये देण्यात आल्या आहेत. सदर माहिती संकलित करण्याचे काम सुरु असून या संदर्भात प्राप्त होणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबतचा निर्णय घेण्याची बाब प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील पुलांची दुरुस्ती करण्याबाबत

**(२८) * १०७२८९ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील लाहे मोडूळ पाडा पूल, काळू नदीवरील गूंडे-डेहणे कोचरे पूल नादुरुस्त झाले असल्याने पावसाळ्यात या पुलावरून प्रवास करणे अडचणीचे होऊन अनेक गावांचा एकमेकांशी संपर्क तुटत असल्याचे तसेच याबाबत वारंवार पत्रव्यवहार करुनही अद्याप या पूलांची दुरुस्ती करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहापूर तालुक्यातील धोकादायक पुलांचे सर्वेक्षण करून त्यांच्या दुरुस्तीस मंजुरी देण्याबाबतची मागणी शहापूरचे लोकप्रतिनिधी यांनी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिनांक २१ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार शहापूर तालुक्यातील लाहे मोडूळ पाडा पूल व काळू नदीवरील गूंडे-डेहणे कोचरे पुलांची दुरुस्ती करण्याबाबत तसेच धोकादायक पुलांचे सर्वेक्षण करून त्यांच्या दुरुस्तीस मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही,

विषयांकित पूल हे सा.बां. विभागाच्या अखत्यारीत रस्त्यांवर नाही.

(२) हे खरे आहे.

लोहे मुंडूळ पाडा रस्ता ग्रामीण मार्ग २६२ असुन या रस्त्यावर कोणताही पूल नाही. तथापि लाहे मंजुळ पाडा येथे खाजगी जमिनीतून जाणाऱ्या नियोजन बाह्य रस्त्यावर जुना लोखंडी पूल असून तो नादुरुस्त आहे. या पूलाचा वापर पादचारी वाहतुकीसाठी करण्यात येतो. गुंड डेहणे पूल व कोचरे पूल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असून वाहतूकीसाठी सुस्थितीत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) शहापूर तालुक्यामध्ये प्रश्नांकित निवेदनामध्ये एकुण २३ पुलांची पाहणी करुन आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे. या पुलांमधील १४ पूल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या व ९ पूल जिल्हा परिषद, ठाणे यांच्या अखत्यारीत आहे. सा.बां.विभागाच्या अखत्यारीतील पूलांचे सर्वेक्षण करुन आवश्यक दुरस्तीची कामे मंजुरी निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे. जिल्हा परीषद, ठाणे यांच्या अखत्यारीतील ९ पूलांबाबत आवश्यक कामे हाती घेण्याचे नियोजन आहे. सद्यस्थितीत या पूलावरुन वाहतुक सुरळीत चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(२९) * १०७४३४ श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील पारेवाडी-राजूरी-विहाळ-अंजनडोह-केम ते दहीवली हा सोलापूर जिल्ह्यातील प्रमुख जिल्हामार्ग क्र. ४ असून सदर रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्यावर ठीक ठिकाणी खड्डे पडून रस्ता वाहतूक अयोग्य झाल्याने या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील बाभूळगाव ते जिंती, पांडे शेलगांव ते केम इत्यादी गावांतील ३९० कि.मी. लांबीचे रस्ते सोलापूर जिल्हा परिषदेने सन २०१३ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केले असून सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याची मागणी ग्रामस्थांनी व लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तालुक्यातील करमाळा-बोरगाव-घारगांव-प्रजिमा-०५, ०९/०० ते १३/०० या रस्त्याचे व कुगाव-चिखलठाण-शेटफळ-जेऊर प्रजिमा-११ किमी ००/०० ते ०७/०० व १२/८०० ते १५/०० या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरणासाठी निधी मिळावा म्हणून या रस्त्यांचा समावेश गट-ब अंतर्गत (ए.एम.सी.) करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार पारेवाडी-राजूरी-विहाळ-अंजनडोह-केम ते दहीवली व बाभूळगाव ते जिंती, पांडे शेलगांव ते केम या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत तसेच करमाळा-बोरगाव-घारगांव-प्रजिमा-०५ व कुगाव-चिखलठाण-शेटफळ-जेऊर प्रजिमा-११ या रस्त्यांचा समावेश गट-ब अंतर्गत (ए.एम.सी.) करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

जिल्हा परिषद सोलापूर यांच्याकडून सुमारे ३८३ कि.मी.लांबीचे रस्ते सा.बां.विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत.

(३) होय.

(४), (५) व (६) प्रश्नाकिंत रस्त्यांच्या दुरुस्ती देखभालीसाठी व्दीवार्षिक करारनाम्याव्दारे निविदा नियमित करण्यात आल्या आहेत. रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरुन रस्ते वाहतूकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत.

या रस्त्याच्या कामी क्षतिग्रस्त लांबीत मजबूतीकरण व डांबरीकरण करणे आवश्यक आहे. ही कामे मंजूरी निधी निकष व प्राधान्याक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## येल्लोरी (ता.औसा, जि.लातूर) परिसरात गारपिटीने झालेल्या नुकसानाची भरपाई देण्याबाबत

**(३०) * १११९५८ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येल्लोरी (ता.औसा, जि.लातूर) परिसरात दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजी झालेल्या प्रचंड गारपिटीत शेतकऱ्यांच्या शेतीपिकांसह फळबागांचे शंभर टक्के नुकसान झाले असून सदर नुकसानीच्या मदतीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी लातूर यांनी शासनास सादर केला असतानाही सदर शेतकऱ्यांना अद्यापी नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी लातूर ग्रामीणचे स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आपत्तीत किती शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून नैसर्गिक आपत्ती अंतर्गत किती रुपये नुकसान भरपाईची मागणी जिल्हाधिकारी, लातूर यांनी शासनास केली आहे,

(४) असल्यास, त्यानुसार उक्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामधील २७ गावांतील घरांची अनधिकृतपणे नोंदणी केल्याबाबत

**(३१) * १०५४०१ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.विजय औटी (पारनेर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने अनधिकृत बांधकामाची नोंदणी बंद केली असताना कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील २७ गावामधील घरांची संबंधित दुय्यम निबंधकाने प्रत्येक घरासाठी ३० ते ७० हजार रुपये घेऊन नोंदणी केल्याचे व सदरच्या नोंदणीसाठी बनावट एन.ए. (अकृषक दाखले) व महानगरपालिकेचे आराखडे जोडले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे उभारण्यात येणाऱ्या इमारतींच्या विकास प्रस्तावावर ठाणे येथील तत्कालीन जिल्हाधिकारी अश्विनी जोशी यांची सही व शिक्के मारलेले अवैध बिनशेती परवाने (एनए) तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांच्या बनावट सह्या करुन विकास प्रस्ताव मंजूर असल्याचे दर्शवून मोठ्या प्रमाणावर इमारती उभ्या केल्या जात असल्याचेही दिनांक ५ जानेवारी, २०१८ रोजी मानपाडा पोलीसांच्या निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी गत तीन महिन्यातील नोंदणी झालेल्या सर्व सदनिकांच्या दस्तऐवजाची तपासणी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, ठाणे यांनी तहसिलदार, कल्याण यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार या प्रकरणातील संबंधित दोषी अधिकारी व इतर संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील** : (१), (२), (३) व (४) कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील २७ गावांमधील अनधिकृत बांधकामाची नोंदणी करू नये असे आदेश शासनस्तरावरून देण्यात आलेले नाहीत. तसेच उक्त भागात पैसे घेऊन दुय्यम निबंधक अनधिकृत घरांची नोंदणी करीत असल्याचे दिसून आले नाही.

तथापि, दुय्यम निबंधक, कल्याण ३ कार्यालयात नोंदलेला दस्त क्र. ४९९०/२०१७ सोबत जोडलेला अकृषक आदेश बनावट असल्याचे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि.०७ डिसेंबर, २०१७ रोजी तहसिलदार, कल्याण यांना कळवून त्याची प्रत सह जिल्हा निबंधक, ठाणे शहर यांना अवगत केल्यावरुन दुय्यम निबंधक, कल्याण क्र.३ यांची फसवणूक करुन दस्त नोंदणी करुन घेतली आणि नोंदणी कायदा १९०८ चे कलम ८२ चा भंग केला म्हणून संबंधित पक्षकार मे.बल्लाळेश्वर कन्स्ट्रक्शनचे भागीदार श्री. सुभाष पाटोळे यांचे विरोधात मानपाडा पोलीस स्टेशन, डोंबिवली पूर्व, ता.कल्याण येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुय्यम निबंधक कल्याण ३ कार्यालयातील दस्तांची तपासणी केली असता मे.बल्लाळेश्वर कन्सट्रक्शन हे पक्षकार असलेल्या एकूण १३ करारनाम्यांची नोंदणी बनावट एन.ए. आदेशाच्या आधारे करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे.
(५) बनावट कागदपत्र जोडून नोंद केलेल्या १३ दस्तऐवजांच्या बाबतीत दुय्यम निबंधक, कल्याण ३ यांची फवसणूक झाल्यावरुन संबंधितांवर मानपाडा पोलीस स्टेशन, डोंबिवली पूर्व येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे पीयूसीची रक्कम जमा होत नसल्याबाबत

**(३२) * १०५८२० प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील प्रादेशिक परिवहन विभागातर्फे पीयूसी प्रमाणपत्र छपाईचा परवाना निविदा पद्धतीने आयकॉन प्रिंट सिस्टिम कंपनीकडे दिला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आयकॉन प्रिंट सिस्टिम कंपनीकडून २०० प्रमाणपत्रांचे एक पावती पुस्तक २०० रुपयांना विकले जाते मात्र या २०० प्रमाणपत्रांवर पीयूसी केंद्रचालक प्रादेशिक परिवहन विभागाने ठरवून दिलेल्या दराच्या दुपटीने आकारणी करून सुमारे १५ ते २० हजार रुपयांची कमाई करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रादेशिक परिवहन विभागाकडे यातील कोणतीही रक्कम जमा होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती पीयूसीची रक्कम प्रादेशिक परिवहन विभागाकडे जमा होण्याबाबत व गैरव्यवहार करणाऱ्या संबधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे आहे.

(२) ते (५) वाहन प्रकार निहाय वायू प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्रांचे दर प्रादेशिक परिवहन कार्यालय पुणे यांच्यामार्फत निश्चित करण्यात आले असून खालीलप्रमाणे आहेत.

| वाहनाचे प्रकार | दर रु. |
|---|---|
| दुचाकी वाहन | ३५ |
| पेट्रोलवरील तीनचाकी वाहन | ७० |
| पेट्रोल/सीएनजी/एलपीजी वर चालणारे चार चाकी वाहन | ९० |
| डिझेल वर चालणारे चाकी वाहन | ११० |

वायूप्रदूषण तपासणी करणाऱ्या केंद्राने वायूप्रदूषण तपासणी केल्याचे कोणतेही शुल्क परिवहन कार्यालयात जमा करणे अभिप्रेत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंबेजोगाई (जि.बीड) तालुक्यातील अतिवृष्टी पिडीत शेतकऱ्यांना पीक विमा मिळण्याबाबत

**(३३) * १०८९६७ श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबेजोगाई (जि.बीड) तालुक्यातील बँकांनी पंतप्रधान पीक विमा योजनेंतर्गत त्रुटीचे प्रस्ताव सादर केल्याने सन २०१६ च्या खरीप हंगामातील पीक विम्यापासून अंबेजोगाई तालुक्यातील शेतकरी वंचित राहिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबेजोगाई तालुक्यातील माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०१६ मध्ये अतिवृष्टीने हजारो हेक्टर क्षेत्रावरील मुग, सोयाबीन, कापूस, बाजरी, तूर या पिकांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी विभागाकडे वेळोवेळी लोकप्रतिनिधींनी मागणी केली असता महाराष्ट्राचे कृषी आयुक्तांनी पीक विमा फेर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, बीड यांना देवूनही प्रस्ताव सादर करण्यात दिरंगाई करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणाची चौकशी करुन अंबेजोगाई तालुक्यातील अतिवृष्टी पिडीत शेतकऱ्यांना पीक विमा मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) अंशत: खरे आहे.

पंतप्रधान पिक विमा योजना सन २०१६ अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा अंबेजोगाई, जि. बीड यांनी माजलगाव तालुक्यातील नित्रुड मंडळातील सोयाबीन पिकाचा विमा घेतलेल्या एका शेतकऱ्याचे महसुल मंडळ "नित्रुड" ऐवजी "अंबेजोगाई" असे नमुद केल्याने सदर शेतकरी विमा नुकसान भरपाईपासून वंचित राहिलेला आहे.

(२) माहे ऑक्टोबर २०१६ अखेर "अतिवृष्टी" व "पुर परिस्थितीमुळे" बीड जिल्हयातील विविध पिकाखालील एकुण ४.५२ लाख हे. क्षेत्र बाधीत झालेले होते. यामध्ये अंबेजोगाई तालुक्यातील विविध पिकाखालील ५७ हजार हे. बाधित क्षेत्राचा समावेश आहे.

(३) हे खरे नाही.

(४) अंबेजोगाई तालुक्यातील ७५३०८ शेतकऱ्यांनी पंतप्रधान पीक विमा योजना खरीप २०१६ मध्ये सहभाग घेतला होता. त्यापैकी ४०२९ शेतकऱ्यांना रु. ५५.४५ लाख नुकसान भरपाई एचडीएफसी इन्शुरन्स विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## टाकळी ढोकेश्वर (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील शेतकऱ्यांचे औषधांच्या फवारणीमुळे झालेले नुकसान

**(३४) * १०६८४९ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाकळी ढोकेश्वर (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील शेकडो शेतकऱ्यांनी कांदा पिकाला बुरशी नाशक म्हणून पार्टनर औषधांची फवारणी केल्यामुळे शेतकऱ्यांचे कांद्याचे पीक जळून लाखो रुपायांचे नुकसान झाल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना बाधक असलेल्या या बुरशी नाशक औषध कंपनीची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.
(२) होय. कांदा पिकाकरीता सदरचे किटकनाशक शिफारस नसताना शेतकऱ्यांना विक्री केल्याबद्दल बुरशीनाशक उत्पादक मे. सफेक्स केमिकल्स इं.प्रा.लि. व वितरक मे. भाग्यश्री कृषि सेवा केंद्र, टाकळी ढोकेश्वर, बिरोबा कृषि सेवा केंद्र, राळेगण थेरपाळ यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली आहे.
(३) तालुका तक्रार निवारण समितीने तक्रारदार शेतकऱ्यांच्या पिक क्षेत्रास भेट देऊन एकुण ५२ शेतकऱ्यांना समितीचा अहवाल देऊन नुकसान भरपाई मिळणेसाठी ग्राहक मंचात दावा दाखल करणेबाबत मार्गदर्शन केलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागात औषध आणि फर्निचर खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(३५) * ११३११९ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागात औषध आणि फर्निचर खरेदीत मोठा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिड वर्षात ४० लाखाची औषधे आणि त्यापेक्षा अधिक किंमतीचे फर्निचर खरेदी करताना रितसर परवानग्या घेण्यात आल्या नसून शासकीय नियमांचे पालन देखील केलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती उक्त गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) लातूर जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागात औषध आणि फर्निचर खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.
(२) व (३) फर्निचर खरेदी संदर्भात सविस्तर चौकशी करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना दिले असून, औषधी खरेदी संदर्भात चौकशी करण्याचे आदेश शासनस्तरावरून देण्यात आले आहेत.
(४) व (५) चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

-----------------

## बृहन्मुंबईतील बंद स्थितीतील आरेच्या स्टॉलचे वाटप सुशिक्षित बेरोजगार तरुणांना करण्याबाबत

**(३६) * १०४७८८ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर व उपनगरात सुमारे १,८११ आरे सरिता आणि आरे डेअरीचे स्टॉल अस्तित्वात असून त्यापैकी अनेक स्टॉल वर्षानुवर्षे बंद असून त्याचा ताबा सद्यस्थितीत आरे डेअरीकडे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई शहर व उपनगरातील अनेक बंदावस्थेत असलेल्या स्टॉलबाबत शासनाने आजतागायत कोणतेही धोरण स्वीकारलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई व उपनगरात सुशिक्षित बेरोजगारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले असल्याने सदरहू बंदावस्थेत असलेल्या आरे स्टॉलचे वाटप सुशिक्षित बेरोजगार तरुणांना करण्याची मागणी मा. दुग्धविकास मंत्री, आणि

मा.राज्यमंत्री, दुग्धविकास, यांजकडे मा.लोकप्रतिनिधी यांनी लेखी निवेदनाद्वारे माहे डिसेंबर, २०१७ च्या तिसऱ्या आठवड्यात केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने मुंबई शहर व उपनगरातील बंदावस्थेत असलेल्या आरेच्या स्टॉलचे वाटप सुशिक्षित बेरोजगार तरुणांना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) अंशत: खरे आहे. सद्य:स्थितीत ९२ आरे विक्री केंद्र बंद असून ते वाटपासाठी उपलब्ध आहेत.

(२) हे खरे नाही. आरे दूध विक्री केंद्र वाटपाबाबतचे धोरण दि.७/७/२०११ अन्वये निश्चित करण्यात आलेले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) बृहन्मुंबई दूध योजनेअंतर्गत शासनाच्या ताब्यात असलेली व वाटपास योग्य असलेली ९२ आरे दूध विक्री केंद्र वाटपाची कार्यवाही विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बालिंगे (जि.कोल्हापूर) येथील भोगावती नदीवरील पुलाला पर्यायी पूल बांधण्याबाबत

**(३७) * ११२२७५ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालिंगे (जि.कोल्हापूर) येथील भोगावती नदीवर बांधण्यात आलेला ब्रिटीशकालीन पूल जीर्ण झाला असून कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जीर्ण पुलावरून अनेक अवजड वाहनांची तसेच ४ साखर कारखान्यांची ऊस वाहतूक सद्यस्थितीत सुरू असल्यामुळे कोणत्याही क्षणी पूल कोसळून जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पुलाबाबत शासनाने चौकशी तसेच पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट केले आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार या पुलाला पर्यायी पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२) नाही
(३) व (४) प्रश्नांकित पूल विजयदुर्ग - तलेरा - गगनबावडा कोल्हापूर रस्ता रा.मा. १७७ च्या कि.मी. १३५/५०० मध्ये आहे. पूल ब्रिटीशकालीन आहे. पूलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले आहे. या स्ट्रक्चरल ऑडिटच्या निष्कर्षानुसार पूल वाहतुकीसाठी सुस्थितीत असून काही आवश्यक दुरुस्तीची कामे करणेची आहेत. ही कामे निविदा स्तरावर असून निविदा निश्चिती करुन काम हाती घेण्याचे नियोजन आहे. सदयस्थितीत पूलावरुन वाहतुक सुरळीत चालू आहे. प्रश्नांकित रस्ता केंद्र शासनाने रा.म. म्हणून घोषित केला आहे. त्यामुळे रस्त्याचे हस्तांतरण केंद्र शासनाकडे करण्याची कार्यवाही प्रगतीत असून हस्तांतरणानंतर रस्त्याची सुधारणा करणे व दुरुस्ती देखभाल केंद्र शासनामार्फत होणे अपेक्षित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वेश्वी (ता.उरण, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील शेतकऱ्यांच्या मच्छी प्रकल्पाच्या इमारतीचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(३८) * १०५१५० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेश्वी (ता.उरण, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील शेतक-यांच्या जमिनीवर राजमाता मच्छीमार सहकारी सोसायटीच्या अंतर्गत लाखो रूपयांचा निधी उपलब्ध असतानाही गेल्या १० वर्षापासून मच्छीप्रकल्पाच्या इमारतीचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समुद्रात मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवाना तसेच मच्छीमार सोसायटयांना सुबकता यावी म्हणून मासळी प्रक्रीया प्रकल्पासाठी राजमाता मच्छिमार सहकारी सोसायटीच्या अंतर्गत मच्छी प्रकल्पाच्या इमारतीसाठी लाखो रूपयांचा निधी मंजूर होवूनसुद्धा प्रकल्पाचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या मत्स्य व्यवसाय विभागातील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे शासनाचे लाखो रूपयांचे नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रकल्प उभारण्यासाठी दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच उक्त मच्छीप्रकल्पाच्या इमारतीचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) अंशत: खरे आहे.

राजमाता विकास मच्छिमार सहकारी संस्थेच्या रू. २३.०७ कोटी इतक्या रकमेच्या मत्स्य प्रक्रिया प्रकल्प खर्चास मान्यता दिली आहे. त्यापैकी ९० टक्के रू. २०.७६ कोटी रकमेपैकी बर्फ कारखाना व शीतगृह उभारणी करिता रू. ३.४२ कोटी इतकी रक्कम मंजूर करण्यात आलेली आहे. सदर मंजूर निधीतून संस्थेने बर्फ कारखाना व शीतगृह इमारतीचे बांधकाम पूर्ण केले असून मासळी प्रक्रिया प्रकल्पाचे बांधकाम अपूर्ण आहे.
(२) अंशत: खरे आहे.

मासळी प्रकल्प, बर्फ कारखाना व शीतगृह उभारणी प्रकल्पाची किंमत वाढल्यामुळे संस्थेने सादर केलेल्या रू. ४६.७४ कोटी इतक्या रकमेच्या सुधारित प्रस्तावास रा.स.वि.नि. ने मान्यता दिलेली आहे. परंतु सन २००६

मध्ये रासविनि ने दिलेल्या अर्थसहाय्यातुन मंजूर केलेल्या १० नौका बांधकाम अपूर्ण असल्यामुळे व सन २००९ मध्ये मत्स्य प्रक्रिया प्रकल्पासाठी मंजूर केलेल्या रकमेतून बांधकाम अपूर्ण असल्यामुळे संस्थेस उर्वरीत तरतूद अदा केलेली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती विभागातील शेतकऱ्यांची विमा कंपन्यांकडून झालेली फसवणूक

**(३९) * १०६९९८ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१६-१७ च्या खरीप हंगामात अमरावती विभागातून विविध पिकांसाठी ३६० ते १८०० रुपयांप्रमाणे १७ लाख शेतकऱ्यांकडून १३५ कोटी रुपयांचा विमा हप्ता वसुल करण्यात आला असून राज्य व केंद्र सरकारच्या वाट्यातील ७८६ कोटी आणि शेतकऱ्यांचा हप्ता मिळून ९२१ कोटी रुपये विमा कंपन्यांना देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती मधील शेतकऱ्यांना केवळ ५६ कोटी रुपयांचीच नुकसानभरपाई विमा कंपन्याकडून मिळाली असून विमा कंपन्याना ८६५ कोटी रुपयांचा लाभ झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शेतकऱ्यांची करोडो रुपयांची फसवणूक करणाऱ्या विमा कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत व शेतकऱ्यांना विम्याची रक्कम मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) खरीप हंगाम २०१६ मध्ये अमरावती विभागातील १७.०२ लाख शेतकऱ्यांनी रु.१३५.८१ कोटी विमा हप्ता भरुन प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभाग घेतलेला होता. विमा हप्ता अनुदानातील राज्य व केंद्र शासनाचा हिस्सा प्रत्येकी रु ३९३.३३ कोटी असून एकुण विमा हप्ता रु ९२२.४७ कोटी इतका होता.

(२) अमरावती विभागातील योजनेत सहभागी शेतकऱ्यांपैकी १.२७ लाख शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरले. पात्र शेतकऱ्यांना रु. ५६ कोटी नुकसान भरपाई रक्कम रिलायन्स जनरल इंशुरन्स विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आलेली आहे.

(३) होय.

(४) केंद्र शासनाने विहीत केलेल्या प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर योजना राबविण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील पूलांची दुरुस्ती करण्याबाबत

**(४०) * १०७८२७ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील जुन्या व मोडकळीस आलेल्या पूलांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी संबंधिताकडे वारंवार निवेदनाद्वारे केली असून अद्यापी याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, बनकिन्होळा (ता.सिल्लोड) येथे स्मशानभूमीकडे जाणाऱ्या नदीपात्रावरील रस्त्यावर पुलाच्या कामाचा सर्वे करण्यात आला होता परंतु उक्त ठिकाणी पूल न बांधता रस्त्याच्या बाजुला दुसऱ्याच ठिकाणी पूल बांधून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सिल्लोड तालुक्यातील जुन्या व मोडकळीस आलेल्या पूलांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत तसेच बनकिन्होळा येथे पूल बांधण्याच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

सिल्लोड तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यांवर ३८ पूल आहेत. या पुलांवरून वाहतूक सुरळीत चालू आहे.पूलांच्या काही दुरूस्त्या करणे आवश्यक असून सदर कामे मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(२) हे खरे नाही.

प्रश्नांकित पूल जलसंपदा विभागामार्फत बांधण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिघी-म्हसळा-माणगांव या रस्त्यावरील दिघी पोर्ट ते माणगांव (जि.रायगड) या टप्प्यातील रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(४१) * १०६३०० श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिघी-म्हसळा-माणगांव (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) या रस्त्यावरील दिघी पोर्ट ते माणगांव या टप्प्यात होणाऱ्या अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे रस्त्याची दुरवस्था होऊन रस्ता उखडला असल्याचे व त्यामुळे पर्यटक तसेच नागरिकांना रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे होऊन अनेक अपघात व वाहतूक कोंडी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत नागरिकांनी दिघी पोर्ट प्रशासनाकडे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये व तत्पूर्वी अनेक वेळा तक्रारवजा निवेदने देऊनही त्याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने दिनांक ०८ डिसेंबर, २०१७ रोजी वेळास या गावाजवळ ग्रामस्थांनी खेड्डेखोदो आंदोलन करुन श्रीवर्धन तहसिलदारांकडे तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर रस्त्याचे दुहेरीकरणाचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाद्वारे प्रगतीत असुन सदर रस्ता बांधकामादरम्यान कंत्राटदारामार्फत वेळोवेळी खड्डे भरण्याचे काम केलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नर्सी नामदेव ते कडती (जि.हिंगोली) रस्त्यावरील कयाधू नदीवरील बंधाऱ्यावर पूल बांधण्याबाबत

**(४२) * ११२५८३ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नर्सी नामदेव ते कडती (जि.हिंगोली) रस्त्यामधील कयाधू नदीवरील बंधाऱ्यावरील पूल अरुंद व मोडकळीस आला असून पुलाला संरक्षक कठडे नसल्याचेही माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पूलावरुन अवजड वाहनांची तसेच वाळुचे ट्रक इत्यादींची मोठ्या प्रमाणात रहदारी असल्यामुळे कोणत्याही क्षणी अपघात घडून जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त ठिकाणी संरक्षक कठड्यासह नवीन पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

बंधाऱ्यावरील पुल दुरुस्तीची कार्यवाही पाटबंधारे विभागाच्या अखत्यारित आहे.
(३), (४) व (५) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सदर पुलाचे तपशीलवार अंदाजपत्रक (DPR) सादर करण्यास शासनाने अधिक्षक अभियंता, (प्र.मं.ग्रा.स.यो.) औरंगाबाद यांना कळविले असून त्यांचेकडून सर्वेक्षणासाठी कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यातील बस आगारांच्या स्वच्छतेसाठी दिलेल्या कंत्राटाबाबत

**(४३) * १०६५८० श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भारत भालके (पंढरपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अमर काळे (आर्वी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या विभागातील ३१ आगारांसह राज्यातील

सर्व बस स्थानकांची सफाई करण्याचे तीन वर्षांकरीताचे कंत्राट ४४७ कोटी रुपयांना एका खाजगी कंपनीला दिल्याचे दिनांक ८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या कंपनी बरोबर हा करार करण्यात आला आहे त्या कंपनीचे नाव व करारातील अटी व शर्ती कोणत्या आहेत तसेच त्याकरीता काढलेल्या निविदेमध्ये किती कंपन्यांनी सहभाग घेतला होता,

(३) असल्यास, राज्यातील ३१ आगारांसह सर्व बस स्थानकांची सफाई करण्याचे काम करणाऱ्या एसटी महामंडळाच्या १८०० सफाई कामगारांना अन्य कामात सामावून घेणे वा पर्यायी नोकरीमध्ये सफाई कामगार वा स्वच्छक या पदावर नेमणूक देण्याची तरतूद असतानाही, खाते प्रमुखांच्या झालेल्या बैठकीत या धोरणाला स्थगिती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू १८०० सफाई कामगार कायमचे बेरोजगार होणार असून या सफाई कामगारांना एसटी महामंडळात अन्य कोणत्या विभागात सामावून घेण्यात येणार आहे वा त्यांच्यासाठी कोणती पर्यायी व्यवस्था करण्यात येणार आहे,

(५) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीअंती ज्या कंपनी बरोबर एसटी महामंडळाने सफाईचा करार केला आहे त्या कंपनीला या बेरोजगार होणाऱ्या १८०० कामगारांना सफाई कामात समाविष्ट करुन घेण्याबाबत व आगारांत अधिक कर्मचारी नियुक्त करुन स्वच्छता मोहीम राबविण्यासोबतच या बस आगारांच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

(२) निविदा प्रक्रीयेद्वारे मे.ब्रिस्क इंडिया प्रा.लि. या कंपनीसोबत महामंडळाद्वारे करार करण्यात आलेला असून, सदर करारामध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस, बसस्थानके, कार्यालये, निवासस्थानांची सामाईक जागा, चालक/वाहक विश्रांतीगृह, अतिथीगृह, पाण्याच्या टाक्या इ.

ची स्वच्छता, तसेच, किटक, डास, वाळवी व ढेकूण प्रतिबंधक औषधे व धूर फवारणी इ. कामे सेवापूरवठादाराने करावयाची आहेत. सदर निविदेमध्ये बी.व्ही.जी.इंडिया लि., ब्रिस्क इंडिया लि., सीआयएस ब्युरोज सिलिटी सर्व्हीसेस प्रा.लि., सुमित फॅसिलिटी प्रा.लि., ए टु झेड इन्फ्रा सर्व्हीसेस लि., टॉप्स सेक्युरिटी लि. या ६ निविदाकारांनी सहभाग घेतला होता.

(३) होय.

राज्य परिवहन महामंडळाच्या दि.०७.११.२०१७ च्या पत्रान्वये स्वच्छक पदामध्ये अनुकंपा तत्वावर अथवा पर्यायी नोकरी देण्याच्या नेमणूका, तसेच लाड-पागे समितीच्या निर्णयानुसार असलेली प्रकरणे वगळून अनुकंपा तत्वावर अथवा पर्यायी नोकरी सफाईगार पदी नेमणूका देण्यास तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे.

(४), (५) व (६) राज्य परिवहन महामंडळामध्ये सध्या कार्यरत असलेल्या सफाईगार ५०८ व स्वच्छक १३१४ असे एकूण १८२२ कर्मचारी असून, सदर कर्मचाऱ्यांना पर्यायी काम देण्याबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

तसेच, साफसफाईसाठी नियुक्त सेवापुरवठादाराने त्याच्या कामात दुर्लक्ष अथवा कामचुकारपणा केल्यास त्याच्यावर दंडात्मक कारवाई करण्याबाबत करारात तरतूद करण्यात आली आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा शहरातील शिवराज पेट्रोलपंप चौकात नव्याने उभारण्यात आलेल्या उड्डाणपूलाबाबत

**(४४) * १०६७७० श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा शहरातील (जि.सातारा) पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गावरील शिवराज पेट्रोलपंप चौकात दोन महिन्यापूर्वी नव्याने उभारण्यात आलेला उड्डाणपूल दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी खचला असून पुलावर मोठा खड्डा पडला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उड्डाण पूल खचल्याने हा मार्ग वाहतूकीकरीता बंद ठेवण्यात आला असून त्यामुळे वाहनचालकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पूलाच्या बांधकामाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या पूलाची दुरुस्ती करण्याबाबत तसेच पुलाचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील** : (१) हे खरे नाही, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत असलेल्या पुणे ते सातारा राष्ट्रीय महामार्गावरील शिवराज पेट्रोल पंपाजवळील भुयारी मार्गासंबंधी दि.२८/१२/२०१७ रोजी प्रसारमाध्यमामध्ये बातमी प्रसिध्द झाल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(२) स्थानिक वाहतूक पोलीसांनी प्रसिध्द झालेली बातमी विचारात घेऊन भुयारी मार्गावरील वाहतूक थांबवली होती हे खरे आहे. तथापि भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी भुयारी मार्गाची पाहणी/ तपासणी केल्यानंतर भुयारीमार्गावरील वाहतूक तातडीने पुन्हा सुरु केली असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(३) सदरील काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत असल्याने त्यांचेमार्फत पाहणी करण्यात आली आहे.

(४) सदरील ठिकाणी दोन्ही बाजूच्या पुलांच्या मध्यभागी असलेल्या २० मि.मी. प्रसरण सांधा असून भुयारीमार्ग वाहतुकीसाठी सुरक्षित असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## आष्टारामपुर आणि पाचखेड (ता.बाभुळगांव, जि.यवतमाळ) येथील वर्धा नदीच्या रेती घाटावरून होत असलेला अवैध रेती उपसा

**(४५) * ११०७७८ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टारामपुर आणि पाचखेड (ता.बाभुळगांव, जि.यवतमाळ) येथील वर्धा नदीच्या रेती घाटावरून ट्रक व ट्रॅक्टरव्दारे अवैधरीत्या रेतीचा उपसा होत असल्याचे तसेच सदर रेती वाहनाच्या क्षमतेपेक्षा जास्त भरून वाहतुक केल्याने या भागातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या अवैध रेती उपशामुळे शासनाच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून रस्त्यांच्या झालेल्या दुरवस्थेमुळे रस्त्यावरून प्रवास करणे नागरिकांना गैरसोयीचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार आष्टारामपुर आणि पाचखेड येथील वर्धा नदीच्या रेती घाटावरून रेतीचा अवैध उपसा करणाऱ्या रेती माफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सन २०१७-१८ या वर्षाकरीता वाळू लिलाव प्रक्रिया करण्यात आली असून मौजे आष्टारामपूर व मौजे पाचखेड येथील रेतीघाटधारकांशी रितसर करारनामे करण्यात येऊन रेतीघाटांचा ताबा देण्यात आलेला आहे. मौजे आष्टारामपूर व मौजे पाचखेड येथील रेतीघाटात अवैध उत्खनन झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात बेसल स्टेज ३ च्या वाहनांची नोंदणी केल्याबाबत

**(४६) * ११०९४० श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी पासून बेसल स्टेज ३ च्या दोन व तीन चाकी वाहनांच्या नोंदणीवर बंदी घातली असतांना प्रादेशिक परिवहन कार्यालय, बुलढाणा येथे माहे सप्टेंबर ते नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत बेसल स्टेज ३ च्या वाहनांची नोंदणी केली असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी व त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती बंदी घालण्यात आलेल्या बेसल स्टेज ३ च्या दोन व तीन चाकी वाहनांची गैरमार्गाने नोंदणी करून गैरव्यवहार करणाऱ्या प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बुलढाणा येथे माहे सप्टेंबर ते नोव्हेंबर २०१७ मध्ये एकूण ४ बी.एस.-III तीनचाकी वाहनांची व १३ दुचाकी वाहनांची नोंदणी करण्यात आलेली आहे. सदरची नोंदणी ही परिवहन आयुक्त कार्यालयाच्या दि.३०.०३.२०१७ च्या परिपत्रकात नमूद असलेल्या सुचनेनूसार करण्यात आलेली आहे. सदर वाहनांची विक्री दि.३१.०३.२०१७ रोजी वा त्यापुर्वी करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील पशुसंवर्धन विभागाला दिलेला निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(४७) * ११०९२९ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा नियोजन समितीने जिल्हापरिषद सोलापूरच्या पशुसंवर्धन विभागाला पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यांसाठी ७० लक्ष रूपयांचा निधी दिला असताना प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे उक्त निधी अखर्चित राहिल्याचे दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ७० लक्ष निधीमधून पशुंना वेळोवेळी उद्‌भवणाऱ्या आजारांचे निदान तसेच औषधे खरेदी करण्याबरोबर पशुवैद्यकीय दवाखान्यांना लागणारे प्राथमिक साहित्य खरेदी करण्याची तरतुद असताना संबंधित अधिकाऱ्यांकडून याकडे दुर्लक्ष केल्यामुळे निधी अखर्चित राहिला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती उपरोक्त घटनेला जबाबदार असणाऱ्या पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नसून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत विविध पशुवैद्यकीय दवाखान्यांना औषधींचा पुरवठा करणे या योजनेसाठी रु. ७०.०० लक्ष निधी प्राप्त झालेला होता. सदर रकमेच्या खरेदीस तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर या रकमेतुन औषधी खरेदी करण्यासाठी दि. ०५/१२/२०१७ रोजी नऊ विविध औषधी कंपन्यांना पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंहगड (ता.हवेली, जि.पुणे) रोडवरील नांदेड फाटा येथील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(४८) * १०४८८१ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंहगड (ता.हवेली, जि.पुणे) रोडवरील नांदेड फाटा येथील पुलाची दुरवस्था झाली असून पुल वाहतुकीसाठी धोकादायक झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नादुरुस्त पुलावरून अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरु असल्याने कोणत्याही क्षणी दुर्घटना घडून जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या पुलाबाबत चौकशी तसेच स्ट्रक्चरल ऑडीट केले आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या व स्ट्रक्चरल ऑडीटच्या अनुषंगाने सदर पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

तथापि प्रश्नांकित पूल रस्त्यावरील वाहतूक वर्दळीचा विचार करता अरुंद असल्याने चार पदरी नवीन पूलाचे बांधकामाची निविदा अंतिम टप्प्यात आहे. निविदा निश्चिती करुन काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## पाल-मोरव्हाल-जिन्सी-रसलपूर-रावेर (ता.रावेर, जि.जळगाव) या रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत

**(४९) * १०९५२० श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाल-मोरव्हाल-जिन्सी-रसलपूर-रावेर (ता.रावेर, जि.जळगाव) प्रजिमा-१७ किमी-२२/०० ते २३/५० या रस्त्याची दुरवस्था होऊन रस्ता वाहतुकीसाठी गैरसोयीचा झाल्याने या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याचे काम वार्षिक देखभाल योजनेंतर्गत (अॅन्युअल मेंटनन्स) मंजूर करण्यासाठी दिनांक १ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे संबंधिताकडे मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त रस्त्याचे काम वार्षिक देखभाल योजनेंतर्गत मंजूर करून तातडीने रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) व (३) प्रश्नाधीन रस्त्याच्या दुरूस्तीचे काम प्रगतीपथावर असून व निविदेतील अटी शर्ती व निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तासगांव (जि.सांगली) येथील येरळा नदी पात्रातून होत असलेला बेकायदा वाळू उपसा

**(५०) * १०७३२५ श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तासगांव (जि.सांगली) येथील येरळा नदी पात्रातून मोठ्या प्रमाणात वाळू उपसा होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या वाळू उपशामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान होत आहे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सदरचा अवैध वाळू उपसा बंद करून वाळू उपसा करणाऱ्यांवर तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) येरळा नदीपात्रात वाळूचे अवैध उत्खनन होत असल्याची काही प्रकरणे निदर्शनास आली आहेत.

तासगांव तालुक्यात दि.१/४/२०१७ ते ३१/१२/२०१७ या कालावधीत वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या एकूण ८३ प्रकरणी रु.७२,५७,७७२/- एवढ्या रक्कमेच्या दंडाचे आदेश पारित करण्यात आले असून त्यापैकी ५३ प्रकरणी रु.३१,५४,२३६/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. उर्वरित ३० प्रकरणांपैकी १५ प्रकरणात संबंधित व्यक्तीच्या मालकीच्या जमिनीच्या अधिकार अभिलेखामध्ये दंडाच्या रकमेचा बोजा चढविण्यात आला असून उर्वरित १५ प्रकरणी दंडाची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच याच कालावधीत गौण खनिजाचे अवैध उत्खनन/ वाहतूकीच्या ०७ प्रकरणात संबंधीतांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले असून "महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, हातभट्टीवाले, औषधीद्रव्य विषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम,१९८१" अन्वये एका प्रकरणात कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीकडे तलाठी, मंडळ अधिकारी यांनी दुर्लक्ष केल्याची बाब निदर्शनास नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## टेंबलाई वाडी (ता.करवीर, जि.कोल्हापूर) येथील इनामी जमिनीवर आकारलेली दंडात्मक रक्कम कमी करण्याबाबत

**(५१) * १०७०१० श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंबलाई वाडी (ता.करवीर, जि.कोल्हापूर) येथील व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांनी इनामी जमिनी विकत घेवून सदर जमिनीवर घरे बांधली असून सदरच्या घरांना रहिवासी दाखला देताना करवीर तहसिल कार्यालयाकडून सध्याच्या बाजारभावाच्या ७५ टक्के दराने दंडात्मक रक्कम आकारली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची दंडात्मक रक्कम बाजारभावाप्रमाणे न आकारता ज्यावेळी जमिनी विकत घेतल्या त्यावेळच्या बाजाभावाप्रमाणे आकारण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी संबंधिताकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार व लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार सदर दंडात्मक रक्कम तत्कालीन बाजारभावाप्रमाणे आकारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) टेंबलाई वाडी (ता.करवीर, जि.कोल्हापूर) येथील इनाम जमिनींचे हस्तांतरण अकृषिक कारणासाठी झालेले असून सदरचे हस्तांतरण सक्षम प्राधिकाऱ्याच्या पुर्वपरवानगीशिवाय झालेले असल्याने व त्याबाबत मा. महालेखापाल कार्यालयाच्या पथकाने उपस्थित केलेल्या शकानुसार तहसिलदार, करवीर यांनी सदरच्या ईनाम जमिनीतील एकूण ११५ खातेदारांना महाराष्ट्र ग्राम कनिष्ठ वतने नाहिशी करणे अधिनियम, १९५९ च्या कलम ५(३)(ब) मधील परंतुकान्वये व शासन परिपत्रक दिनांक ०९.०७.२००२ मधील तरतूदीनुसार हस्तांतरण विनापरवानगी असल्याने चालू बाजारभावाच्या ५० % नजराणा व नजराणा रक्कमेच्या ५० % दंड अशी एकूण ७५ % रक्कम भरण्याबाबत नोटीसा देण्यात आल्या होत्या. या एकूण ११५ खातेदारांपैकी ७३ खातेदारांनी रुपये १,६६,७८,९८०/- इतकी रक्कम शासकीय कोषागारात भरली आहे. उर्वरित ४२ खातेदारांनी वाढीव मुदतीत नजरणा व दंडाची रक्कम भरली नसल्याने ४२ मिळकतधारकांच्या गा.न.नं. ७/१२ पत्रकी महाराष्ट्र शासनाचे नाव दाखल करण्यात आले आहे.

(२) या प्रकारची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे. तथापि, इनाम जमिनीच्या विनापरवाना हस्तांतरणापोटी नजराणा व दंडात्मक रक्कम ज्यावेळी जमिनी विकत घेतल्या त्यावेळच्या बाजारभावानुसार आकारण्याबाबतची तरतूद उक्त अधिनियमात नसल्याने त्याप्रमाणे कार्यवाही करता येत नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यातील खेड-खारी देवनागिरी पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(५२) * १०५६४९ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील खेड-खारी देवनागिरी पुलाचे काम अपूर्णावस्थेत असून दोन वर्षापासून काम बंद असल्यामुळे खारी, नांदगांव व कोरेगांव येथील सुमारे दीडशे विदयार्थी आणि दोनशेहून अधिक कामगार व नोकरदाराना जीर्ण व धोकादायक झालेल्या लोखंडी पुलावरून प्रवास करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी संबंधिताकडे वारंवार तक्रार करूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर पुलाचे काम तातडीने पूर्ण करून दोन वर्षापासून काम बंद ठेवणाऱ्या ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

(२) प्रश्नांकित पूलाचे काम खेड तालुक्यातील वणौशी-आगरवायंगणी-संगलट-कोरेगाव खेड प्रजिमा १३ वर कि.मी.३६/५०० मध्ये काम प्रगतीत आहे. पूलाचे काम जगबुडी व संगमा या दोन मोठया नद्यांच्या संगमाजवळ असून या ठिकाणी भरती ओहोटीचाही परिणाम होत असल्याने काम करताना काही विलंब झाला आहे. काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

या पूलाचे वरील बाजूस सध्या वापरात असलेला पादचारी लोखंडी साकव आहे. या साकवाच्या दुरुस्तीचे काम मंजूरी, निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जनावरांना लाळ खुरकुत रोगापासून प्रतिबंध करण्यासाठी देण्यात येणाऱ्या एफएमडी लसीबाबत

**(५३) * १०५३२२ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे दोन कोटी दहा लाख जनावरे असून त्यांना लाळ खुरकुत रोगापासून संरक्षण मिळण्याकरिता साधारणत: दरवर्षी सप्टेंबर महिन्यात त्यांचे लसीकरण केले जाते परंतु यावर्षी जनावरांना लाळ खुरकुत या रोगापासून संरक्षण देणारी एफएमडीची लस दिली नसल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने पाळीव जनावरांचे संसर्गजन्य रोगांपासून संरक्षण करण्याकरीता, लसीकरण करण्यासाठी, दरवर्षी ७५ टक्के प्रमाणे देण्यात येणाऱ्या निधीला स्थगिती दिल्यामुळे लसिकरण झाले नसून त्यामुळे

या प्राण्यांचे आरोग्य धोक्यात येवून दुग्ध व्यवसायावरही त्याचा अनिष्ट परिणाम झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, पशुसंवर्धन विभागांतर्गत एफएमडी लस खरेदी प्रकरणी नियमबाह्य निविदाप्रक्रिया राबवून ठराविक निविदाकारास फायदा मिळवून देण्यासाठी राज्यातील पशुधनाचे आरोग्य वेठीस धरुन कोट्यवधीचा गैरव्यवहार करण्यात आल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत विभागाचे प्रधान सचिव, सचिव, उद्योग संचालक, आयुक्त या सर्वांचे अभिप्राय डावलून मे. बॉयोवेट प्रा.लि. या कंपनीची निविदा मंजूर करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणाची चौकशी सक्षम यंत्रणेमार्फत शासनाने केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीनुसार संबंधित निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत, केंद्र शासनाकडून निधी मिळविण्याबाबत व राज्यात पशुधनांची एफएमडी लसीकरण मोहिम तातडीने राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे आहे.

राज्यात सन २०१२ च्या १९ व्या पशुगणनेनुसार गाय वर्गीय व म्हैस वर्गीय एकुण २,०८,७८,३७८ इतके पशुधन आहे. एफएमडी सीपी या केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत सन २०१०-११ पासून संपूर्ण राज्यात दर ६ महिन्यांच्या अंतराने लाळखुरकुत रोग प्रतिबंधक लसीकरण राज्यातील सर्व गाय वर्गीय व म्हैस वर्गीय जनावरांना केले जाते. १२ वी लसीकरण फेरी माहे जुलै - ऑगस्ट, २०१७ मध्ये प्रस्तावीत होती. त्या अनुषंगाने एफएमडी लस खरेदीसाठी ई निविदा प्रक्रिया दि. ०४/०५/२०१७ पासून सूरु करण्यात आली तथापि, तांत्रिक अडी अडचणीमुळे निविदेस विलंब होत आहे व त्यामुळे लसीकरण होवू शकले नाही.

सन २०१७-१८ मध्ये माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर या महिन्यात बीड, उस्मानाबाद, सोलापूर व कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखाने क्षेत्र, उस

तोडीसाठी स्थलांतरीत होणारी जनावरे तसेच, राज्याच्या सीमावर्ती भागातील जनावरांना लसीकरण करण्यासाठी एकूण ५,२३,००० लस मात्रा उपलब्ध करून देण्यात आलेल्या होत्या. तसेच, अहमदनगर जिल्हयात जिल्हा परिषद स्वनिधीमधून एकूण ८४,७१० लाळ खुरकुत रोग प्रतिबंधक लस मात्रा खरेदी करण्यात आलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात सदर योजने अंतर्गत पहिल्या व दुस-या हप्त्यांतर्गत केंद्र शासनाचा ६० टक्के हिश्याचा एकूण निधी रु.२४.२८ कोटी राज्यास प्राप्त झालेला आहे. केंद्र शासनाने या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी निधी वितरणास कोणतीही स्थगिती दिलेली नाही.

लसीकरणास झालेल्या विलंबामुळे राज्यातील पशुधनास लाळखुरकुत रोग प्रार्दुभाव झाल्याचे आढळुन आलेले नाही. तसेच, त्यामुळे दुग्ध व्यवसायावर कोणताही परिणाम झालेला नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

शासनाच्या धोरणानुसार रु. ३ लाखाच्या वर खरेदी असल्यास ई निविदेव्दारे उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दि. ०१/१२/२०१६ अन्वये तसेच, वेळोवेळी शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे लाळखुरकुत लस खरेदी प्रक्रीया राबविली जात असून अद्याप निविदा प्रक्रिया अंतिम झालेली नसल्याने, लसमात्रांची प्रत्यक्ष खरेदी झालेली नसल्यामुळे गैरव्यवहार होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) लस खरेदी प्रक्रियेमध्ये कोणताही गैरव्यवहार झालेला नसल्यामुळे तसेच, केंद्र शासनाकडून ६० टक्के केंद्र हिश्याचा एकूण निधी रू.२४.२८ कोटी राज्यास प्राप्त झाल्यामुळे दोषींवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. लसीकरण मोहीम तातडीने राबविण्यासाठी दि.१२.०२.२०१८ पासून फेर निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाडळी व धामणी (जि.सांगली) येथील शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावरील टेंभू पुनर्वसनासाठी भुसंपादनास पात्र असल्याचा शेरा काढण्याबाबत

**(५४) * १०५१२९ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाडळी व धामणी (जि.सांगली) येथील शेतकऱ्यांच्या शेतजमीनींच्या सातबाऱ्यावरील इतर हक्कात टेंभु पुनर्वसनासाठी भूसंपादनास पात्र असे शेरे सुमारे १५ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासुन असल्याने शेतक-यांना त्रासदायक अडचणींना सामोरे जावे लागत असुन सदरचे शेरे कमी करण्यासाठी दिनांक ०५ जानेवारी,२०१८ रोजी तसेच वारंवार आयुक्त (पुनर्वसन), पुणे, उपायुक्त (पुनर्वसन), पुणे जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) यांचेकडे निवेदनव्दारे मागण्या केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे इतरत्र पुनर्वसन झालेले असल्याने टेंभूचा संपूर्ण प्रस्ताव रद्द झालेला असल्याचे भूसंपादन (सांगली) विभागाने उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) यांना यापूर्वीच कळविलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सादर केलेल्या निवेदनातील मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, त्यानुषंगाने शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावर असलेले टेंभू पुनर्वसनाच्या भुसंपादनास पात्र असे शेरे काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, असे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) भूसंपादन अधिकाऱ्यांनी याबाबत पुनर्वसन अधिकाऱ्यांशी पत्र व्यवहार केलेला आहे.

(३) सदर गावातील वैयक्तीक स्लॅबपात्र खातेदार यांचे ७/१२ च्या इतर हक्कात असलेले " तबदिलीस मनाई " / भूसंपादनास पात्र इ. शेरे कमी करणे बाबतची मागणी करण्यात आली आहे.

(४) या संदर्भात छाननी करुन कार्यवाही करावी व त्याचा अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त, पुणे यांना दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सुक्ष्म सिंचन संचाचे अनुदान वितरीत करण्याबाबत

**(५५) * १०५०१४ श्री.संजय सावकारे (भुसावळ), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुक्ष्मसिंचन योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडून राज्याला मंजूर झालेल्या ३८० कोटी रुपये अनुदानापैकी पहिल्या टप्प्यात १९० कोटी अनुदान राज्य सरकारला प्राप्त झाले असून राज्याच्या हिस्स्याचे १२६ कोटी असे एकूण ३१६ कोटी रुपये अनुदान शासनाकडे उपलब्ध आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उपलब्ध निधीपैकी ६० टक्के निधी शेतकऱ्यांना वितरीत करण्याबाबतचे आदेश कृषी आयुक्तांनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले असतानाही कृषी विभागातील ऑनलाईन संगणकीय प्रकियेतील गोंधळामुळे गत ६ महिन्यांपासून सुक्ष्म सिंचन संचाच्या अनुदानाचे वितरण प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती शेतकऱ्यांना सुक्ष्म सिंचन संचाच्या अनुदानाचे वितरण तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.

(२), (३) व (४) नाही.

सुक्ष्म सिंचन संचाची उभारणी करुन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केलेल्या १९७६२९ शेतकऱ्यांपैकी १२३५२५ शेतकऱ्यांची मोका तपासणी करुन १०२८८१ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम रु. २५५.७९ कोटी आरटीजीएस द्वारे जमा करण्यात आली आहे. उर्वरीत शेतकऱ्यांची मोका तपासणी करुन अनुदान देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) तहसिल कार्यालयातून अवैध अधिवास दाखले वितरीत झाल्याबाबत

**(५६) * १०४८५९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तहसिल कार्यालयातून रिक्षा व बॅच परवान्यासाठी परप्रांतीयांना अवैध अधिवास दाखले देण्यात आले असून उपरोक्त प्रकरणी शासनाने दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास चौकशीचे आदेश दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सदरचे अवैध अधिवास दाखले तसेच या दाखल्याच्या आधारे मिळविलेले रिक्षा व बॅच परवाने रद्द करण्याबाबत तसेच अवैध दाखले देणाऱ्या सबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) ऑटोरिक्षा बॅजसाठी स्थानिक रहिवासी दाखले सादर करणे अनिवार्य आहे. अर्जदारास इरादापत्र मिळणे करीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केले जातात. सदर अर्जदाराच्या कागदपत्रांची तपासणी मोटारवाहन निरिक्षक व सहायक मोटार वाहन निरिक्षक यांच्याकडून केल्यानंतरच सदर अर्जदारास इरादापत्र जारी केले जाते. इरादापत्राकरीता अर्ज घेताना अर्जदाराकडून त्यानी जोडलेल्या कागदपत्रांच्या सत्यतेबाबत प्रतिज्ञापत्र घेतले जाते.

विहित नमून्यातील अधिकारपत्र मिळण्यासाठी महाराष्ट्र मोटार नियम, १९८९ चे नियम ४ (२) मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकरणाकडून म्हणजेच महसूल विभागाकडून अर्जदारास एस.ई.सी. नमून्यातील स्थानिकत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त करून सादर करणे आवश्यक आहे.

अधिवास दाखले हे तहसिलदार कार्यालयाकडून निर्गमित केले जातात. उपरोक्त कालावधीत अवैध निवासी दाखल्या आधारे परवाना मिळविल्याचे प्रकरणाविषयीची बाब उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई कार्यालयाच्या निदर्शनास आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दुष्काळ व्यवस्थापन संहितेतील निकषांमध्ये सुधारणा करण्याबाबत

**(५७) * १०४९६० श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड**

**(धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), कुमारी प्रणिती**

**शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१७ च्या खरीप हंगामात ९ हजार गावांमधील पिकांची आणेवारी ५० पैशापेक्षा कमी आढळून आली असून केंद्र शासनाच्या दुष्काळ व्यवस्थापन संहितेतील निकषानुसार पैसेवारीचा निकष कालबाह्य ठरल्याने या ९ हजार गावातील शेतकऱ्यांना शासनाची कोणतीही मदत मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यात यावर्षी अपेक्षीत पावसाच्या तुलनेत कमी पाऊस झाल्याने मराठवाड्यातील ८ हजार ५२५ पैकी तब्बल ३ हजार ५७७ गावांची अंतिम पैसेवारी ५० टक्क्यापेक्षा कमी आली असून या गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता असल्याने व अपेक्षित पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी यावर्षी दुष्काळ व्यवस्थापन संहितेतील मदतीचे निकष बदलण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यातील ग्रामीण भागात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पिके नष्ट झाली असून कापूस उत्पादक भागात पिकांना कीड लागून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तसेच या जिल्ह्यातील ग्रामीण भागात ५० टक्के पेक्षा कमी आणेवारी आल्याचा अहवाल शासनास सादर करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्रशासनाच्या दुष्काळ व्यवस्थापन संहितेतील निकष संकटांच्या कोणत्याच परिस्थितीत सुसंगत नसल्याने त्यात सुधारणा करण्याबाबत शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दुष्काळ व्यवस्थापन संहितेतील निकषांमध्ये सुधारणा करण्याबाबत व पाणी टंचाई दूर करुन दुष्काळग्रस्तांना मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) राज्यात सन २०१७ च्या खरीप हंगामात १४६७९ गावांमध्ये अंतीम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेली आहे. केंद्र शासनाच्या दुष्काळ व्यवस्थापन संहिता मधील निकषानुसार या गावांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला नाही. सदर गावांमध्ये दुष्काळाची मदत अनुज्ञेय नाही.

(२) मराठवाड्यात या वर्षी सरासरी ७२.९० टक्के पाऊस झाला आहे. सन २०१७ च्या खरीप हंगामात ३५७७ गावांची अंतीम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेली असून औरंगाबाद विभागात १११ गावांना व ३ वाड्यांना एकूण १३८ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. दुष्काळामध्ये देण्यात येणाऱ्या मदतीचे निकष बदलण्याचा प्रस्ताव विचाराधीन नाही.

(३) सन २०१७ च्या हंगामात विदर्भातील एकूण ९७९९ गावांची अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेली आहे.

(४) व (५) केंद्र शासनाच्या दुष्काळ संहिता २०१६ च्या निकषाबाबत राज्य शासनाचे अभिप्राय केंद्र शासनास कळविण्यात आले आहेत.

राज्यात आवश्यक तेथे टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत असून एकूण २५७ गावे व ४ वाड्यांना एकूण २३८ टँकरद्वारे पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) येथील पिरवाडी समुद्र किनाऱ्याचे समुद्राच्या लाटांमुळे झालेले नुकसान

**(५८) * १०६११६ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नारळी फोफळीच्या बागा आणि विस्तिर्ण समुद्र किनारा यामुळे उरणचा (जि.रायगड) 'मरीन ड्रॉईव्ह' म्हणून ओळखला जाणारा पिरवाडी समुद्र किनारा समुद्राच्या लाटांमुळे खचला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समुद्रांच्या लाटांपासून सदर किनारपट्टीचे संरक्षण करण्यासाठी बांधण्यात आलेल्या निकृष्ट धुपप्रतीबंधक बंधाऱ्यामुळे किनाऱ्याचे नुकसान

झाले असून किनाऱ्यावर दगड व मातीचा खच पडल्याने पर्यटकांना चालणेही गैरसोयीचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर निकृष्ट धुपप्रतिबंधक बंधाऱ्याचे बांधकाम करणाऱ्या कंत्राटदाराविरूद्ध तसेच जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करून किनारपट्टीचे संरक्षण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील** : (१) पिरवाडी ते नागाव या भागातील समुद्र किनाऱ्यापैकी नागाव जवळील किनाऱ्याची समुद्राच्या लाटांमुळे काही प्रमाणात धूप होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पिरवाडी समुद्र किनारी कोणतेही समुद्र धुपप्रतिबंधक बंधाऱ्याचे काम करण्यात आलेले नाही. तथापि, पिरवाडी किनाऱ्यावर ONGC मार्फत बांधण्यात आलेला दगडी बंधारा काही प्रमाणात क्षतिग्रस्त झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) ONGC ही केंद्र शासनाची अंगीकृत संस्था असल्याने संबंधित संस्थेस कार्यवाहीसाठी किनारी अभियंता यांचेमार्फत कळविण्यात आले आहे.

तसेच पिरवाडी किनाऱ्यावर ४०० मीटर लांबीचा समुद्र धूपप्रतिबंधक बंधारा बांधणे हे काम अर्थसंकल्प २०१७-१८ मध्ये समाविष्ट करण्यात आले असून किनारपट्टी क्षेत्र अधिनियम २०११ नुसार मंजूरी (C.R.Z. Clearance) प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करुन निधी उपलब्धतेनुसार बंधाऱ्याचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## संगमेश्वर - देवरूख - साखरपा (जि.रत्नागिरी) या राज्यमार्गाच्या कामाबाबत

**(५९) * ११२४६६ श्री.नितेश राणे (कणकवली)** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर - देवरूख - साखरपा (जि.रत्नागिरी) हा ३४ कि.मी.लांबीचा प्रमुख राज्यमार्ग असून तो साखरपा तिठा येथे रत्नागिरी - कोल्हापूर- नागपूर महामार्गाला तर सोनवी तिठा येथे तो मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ (पूर्वीचा रा.महा.क्र.१७) जोडला जात असून या संपूर्ण मार्गाच्या रूंदीकरण व मजबुतीकरणासाठी माहे एप्रिल, २०१६ मध्ये विशेष योजनेतून ३२ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा ३२ कोटींचा निधी मंजूर होऊनसुद्धा सदरहू रस्त्याच्या रूंदीकरण व मजबुतीकरणाच्या कामास सुरुवात झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय तसेच अद्यापी सदरहू कामास सुरूवात न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर राज्यमार्गाच्या रूंदीकरण व मजबुतीकरणाच्या कामास तातडीने सुरुवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, खरे आहे.

प्रस्तुत कामास शासनाने रु. ३२ कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. काम अर्थसंकल्पात समाविष्ट आहे.

(२), (३) व (४) कामाच्या निविदा बोलावण्यात आल्या आहेत. निविदा निश्चिती करुन काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## मुंबई-पुणे महामार्गावर खालापूर येथे व्यावसायिकांनी अनधिकृतपणे मेडीयन कटिंग करुन वळण रस्ते तयार केल्याबाबत

**(६०) * १०५०३६ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे महामार्गावर खालापूर येथे अनेक हॉटेल, ढाबे, पेट्रोलपंप, डान्स बार व लॉज असून त्यांच्या मालकांनी त्यांच्या सोयीप्रमाणे मेडीयन कटिंग करुन वळण रस्ते तयार केल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनधिकृतपणे केलेल्या मेडीयन कटिंगकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाले असून त्यामुळे येथे अनेक अपघात घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त महामार्गावर अनधिकृतपणे मेडियन कटिंग करणाऱ्या संबधित व्यावसायिकांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) पुणे मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्र.४ वर खालापूर येथे ज्या व्यावसायिकांनी त्यांच्या सोयीसाठी अनधिकृतरित्या मेडीयन कटींग करुन वळण रस्ते तयार केले होते, त्या सर्व व्यावसायिकांना भविष्यात कोणत्याही प्रकारचे गंभीर अपघात झाल्यास त्याबाबत ते सर्वस्वी जबाबदार राहतील अशा आशयाच्या नोटीसा सवलतकारामार्फत तात्काळ बजावण्यात आल्या. तसेच अनधिकृतरित्या तयार करण्यात आलेल्या मेडीयन कटींगसुध्दा सवलतकारामार्फत बंद करण्यात आलेल्या आहेत. याबाबत पोलीस स्टेशन खालापूर यांचेकडे चौकशी करण्यात आली असुन सदर लेन कटींगमुळेच त्या ठिकाणी अपघात झाल्याचे अभिलेख्यावरुन दिसून येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मांजरा मत्स्यबीज उत्पादन केंद्र (ता.केज, जि.बीड) बंद असल्याबाबत

**(६१) * १०८९७९ श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांजरा मत्स्यबीज उत्पादण केंद्र (ता.केज, जि.बीड) सन २०१२ पासून बंद असल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर केंद्र मराठवाड्यातील सर्वात मोठे मत्स्यबीज उत्पादन केंद्र असून सन २०१२ पासून हे केंद्र बंद असल्याने अनेक तरुणांचे मत्स्यपालन उद्योग व शेतकरी वर्गाचा जोडधंदा बंद झाल्याने अनेक तरुण बेरोजगार झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मांजरा मत्स्यबीज उत्पादन केंद्र सुरु करण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या मत्स्यविकास विभागाकडे लोकप्रतिनिधीनी वेळोवेळी मागणी करूनही जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणाची चौकशी करुन मांजरा मत्स्यबीज उत्पादन केंद्र पुर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) बीड जिल्ह्यात सन २०११-१२ पासून अवर्षण परिस्थिती असल्यामुळे मांजरा मत्स्यबीज उत्पादन केंद्राचे कार्य थांबले होते.

(२) मराठवाड्यातील बेरोजगार तरूणांना व शेतकऱ्यांना मत्स्यपालन उद्योगासाठी आवश्यक असलेले मत्स्यबीज मराठवाड्यातील ९ शासकीय मत्स्यबीज उत्पादन केंद्र, ४ शासकीय मत्स्यबीज संवर्धन केंद्र व ५ खाजगी मत्स्यबीज केंद्रे अशा एकूण १८ केंद्राद्वारे पुरवठा करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) शासन निर्णय क्र. मत्स्यवि २०१३/ सं.क्र. ३३४/प्र. क्र. ९५/पदुम १३, दि. १८.०१.२०१४ अन्वये मत्स्यबीज केंद्र भाडेपट्टीने देण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्र भाडेपट्टीने देण्याकरिता ७ वेळा ई-निविदा प्रसिद्ध केल्या आहेत. परंतु प्रतिसाद न मिळाल्यामुळे नव्याने पुन्हा ई-निविदा दि. १४.०२.२०१८ रोजी काढणेत आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रसायनी (ता.पनवेल, जि.रायगड) येथील एचओसी कंपनीची जमीन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना परत करण्याबाबत

**(६२) * १०५१६० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रसायनी (ता.पनवेल, जि.रायगड) येथील एचओसी कंपनीच्या प्रकल्पासाठी हस्तांतरीत केलेल्या परंतु विनावापर असलेल्या शेतजमिनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना परत कराव्यात अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरातील मौजे पोसरी, सावळे, तुराडे, दापिवली, आंबिवली, पराडे, वासांबे व देवळोली गावातील एचओसी कंपनीच्या प्रकल्पासाठी हस्तांतरीत करण्यात आलेल्या १६०० एकर जमिनीपैकी ४४२ एकर जमिन विना वापर पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विनावापर असलेली जमिन प्रकल्पग्रस्तांना परत करण्याबाबत शासनाचे धोरण असून या धोरणाप्रमाणे एचओसी कंपनीने उक्त ४४२ एकर जमिन प्रकल्पग्रस्तांना परत करणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार एचओसी कंपनीची विनावापर असलेली उक्त ४४२ एकर जमिन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) मा.सर्वोच्च न्यायालयाने संपादन प्रयोजनासाठी वापरून अतिरिक्त झालेल्या जमिनीच्या संदर्भात दिवाणी अपील क्र.३६२८/१९९७ (विशेष अनुमती याचिका क्र.२६०४/१९९२) केरळ राज्य विरुद्ध एम. भास्करन पिल्लाई व इतर या प्रकरणात दि.५.५.१९९७ रोजी न्यायनिर्णय दिलेला आहे. त्यानुसार शासन निर्णय क्र.एलक्यूएन-३०/२०००/प्र.क्र.६७/अ-२, दि.१२/०३/२००४ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयात संपादन प्रयोजनासाठी वापरून अतिरिक्त झालेल्या किंवा विनावापर असलेल्या जमिनीची अन्य सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता नसेल तर अशा जमिनीची केवळ जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्यात यावी, परंतु ती

मूळ भूधारकाला परत करू नये असे नमूद आहे. त्यामुळे मूळ शेतकऱ्यांना वापरात नसलेली संपादित जमीन परत देणे शक्य होणार नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बडनेरा ते अकोला या मार्गाची दुरुस्ती करण्याबाबत

**(६३) * १०९०५३ अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बडनेरा ते अकोला या मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्यामुळे वाहनचालकांना वाहने चालविणे गैरसोयीचे होऊन रस्त्यावर माहे नोव्हेंबर, २०१७ मधील अपघातात ६ व्यक्तींचा तर दिनांक २४ डिसेंबर, २०१७ रोजीच्या अपघातात ४ व्यक्तींचा मृत्यू झाला असल्याचे तसेच या महामार्गावर होणाऱ्या अनेक अपघातात अनेक नागरिक गंभीर जखमी झाले असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यावर पडलेले खड्डे सार्वजनिक बांधकाम विभागाने बुझविले नसल्याने सदर अपघात घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त मार्गाची दुरुस्ती करण्याबाबत तसेच दुरुस्तीस विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) प्रश्नाधीन बडनेरा ते अकोला हा रस्ता भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत मे.अमरावती-चिखली एक्सप्रेस वे लि. ह्या सवलतकाराकडून खाजगीकरणातून चौपदरीकरण प्रगतीपथावर असलेल्या अमरावती ते चिखली ह्या १९४ कि.मी. राष्ट्रीय महामार्गाचा भाग आहे. त्या रस्त्यावर खड्डयामुळे सदर अपघात झाल्याचे खरे नाही तसेच सदर अपघात रस्त्यावरील खड्डयांमुळे झाल्याचे पोलीस यंत्रणेनी कळविले

नसल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,अमरावती यांनी कळविले आहे.

(२) हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत नसून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे. रस्त्याची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी ही सवलतदार मे.अमरावती-चिखली एक्सप्रेसवे लि.ची असून खड्डयांची दुरुस्ती केलेली असून आता रस्ता सुस्थितीत आहे, तसेच खड्डे दुरुस्तीचे काम हे नियमित देखभाल दुरुस्ती अंतर्गत सवलतदार कंपनीद्वारे सुरु आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांनी कळविले आहे.

(३) सदर काम हे केंद्र शासनाच्या अखत्यारित येत असल्यामुळे राज्य शासनाचा चौकशी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवगांव रंगारी (जि.औरंगाबाद) परिसर व शिवना नदी पात्रातील अवैध वाळू उपसा

**(६४) * १०८६९१ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगांव रंगारी (जि.औरंगाबाद) परिसरात व शिवना नदी पात्रात महसूल व पोलीस प्रशासनातील काही अधिका-यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा सुरु असल्याचे तसेच या अवैध वाळू उपशामुळे शिवना नदी पात्राचे नुकसान झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी उपसा केलेल्या वाळूची अवैध मार्गाने वाहतूक करण्यात येत असून संबंधित विभागाचे अधिकारी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार देवगांव रंगारी परिसरात व शिवना नदी पात्रात वाळू उपसा करून वाळूची वाहतूक करणाऱ्या वाळू माफियांवर तसेच त्यास सहकार्य करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) असे निदर्शनास आले नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे ओखी चक्रीवादळ व अवेळी पडलेल्या पावसामुळे झालेले नुकसान

**(६५) * १०६३२० श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.संजय कदम (दापोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड जिल्ह्यात माहे डिसेंबर, २०१७ मध्ये आलेल्या ओखी वादळ व अवेळी पडलेल्या पावसामुळे आंबा पिकाचा मोहोर गळून नुकसान झाल्याने केवळ १ टक्का आंब्याचे उत्पादन बागायतदारांना मिळणार आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मच्छिमारांच्या बोटीचे व मच्छिमार जाळीचे या वादळामुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असून याबाबतचा सर्वे जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी करुन माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात अहवाल सादर केलेला असतानाही मच्छिमाराना आजमितीस नुकसान भरपाई मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, रायगड जिल्ह्यात माहे जून ते जुलै, २०१७ या दोन महिन्यांमध्ये पाऊस जास्त पडल्याने येथील शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावले असताना, माहे ऑक्टोबर व डिसेंबर, २०१७ मध्ये झालेल्या वादळी पाऊस व अतिवृष्टीमुळे ६ हजार ७०२.३६ हेक्टर क्षेत्रातील भातपिकांसह अन्य पिकांचे नुकसान झाले असल्याचे तसेच या नुकसानीमुळे सुमारे १८ हजार ९४६ शेतकरी बाधित झाले असून त्यांच्या नुकसान भरपाईसाठी शासनाकडून सुमारे १५ कोटी ९ लाख ७१ हजार ५०० रूपयांच्या नुकसान भरपाईची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार ओखी वादळ व अवेळी पडलेल्या पावसामुळे नुकसानग्रस्त कोकणातील आंबा बागायतदार, मच्छिमार व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील** : (१) माहे डिसेंबर, २०१७ मध्ये आलेल्या ओखी वादळ व अवेळी पडलेल्या पावसामुळे रायगड जिल्ह्यातील आंबा बागायतीचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, माहे डिसेंबर, २०१७ मध्ये आलेल्या ओखी वादळ व अवेळी पडलेल्या पावसामुळे रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा बागायतीचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) होय.

(३) रायगड जिल्ह्यामध्ये माहे जून, २०१७ ते जुलै, २०१७ या दोन महिन्यामध्ये लागवडीची कामे वेळीच पूर्ण झाली असल्याने दुबार पेरणीचे संकट ओढवले असल्याचे निदर्शनास आले नाही. तथापि रायगड जिल्ह्यामध्ये

माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये झालेल्या परतीच्या पावसामुळे भात व आंबा पिकाचे एकूण १८५४३ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले. तसेच माहे डिसेंबर, २०१७ मध्ये झालेल्या ओखी चक्रीवादळामुळे तसेच त्यामुळे झालेल्या अवकाळी पावसामुळे रायगड जिल्ह्यात एकूण २३७४.९८ हेक्टर शेतीपिकांचे व फळपिकांचे ३३% च्या वर नुकसान झाले असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

(४) व (५) शासनपत्रे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ व दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ अन्वये अनुक्रमे राज्यात माहे जून ते सप्टेंबर, २०१७ मधील अतिवृष्टीमुळे व माहे ऑक्टोबर, २०१७ मधील परतीच्या पावसामुळे झालेल्या शेतीपिकांच्या व फळपिकांच्या नुकसानीबाबत संयुक्त पंचनामे करुन नुकसानीचा अहवाल शासनास सादर करण्याबाबतचा सूचना क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

सदर माहिती संकलित करण्याचे काम प्रगतीपथावर असून यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबतचा निर्णय घेण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच शासन निर्णय दिनांक २१.०२.२०१८ अन्वये, दिनांक ४ ते ६ डिसेंबर २०१७ या कालावधीत राज्यात आलेल्या ओखी चक्रीवादळामुळे व त्यामुळे आलेल्या पावसामुळे नुकसान झालेल्या बाधितांना मदत देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंजवडी (जि.पुणे) येथे सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) जप्त केलेल्या भूखंडावर तीन इमारती बांधल्याबाबत

**(६६) * १०४८८८ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंजवडी, पुणे येथे सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) जप्त केलेल्या ८३ गुंठे भूखंडावर इमारत बांधून त्यातील सदनिकांची विक्री केल्याचे व येथील

सदनिका हिंजवडी माहिती तंत्रज्ञान कंपनीतील ९० संगणक अभियंत्यांनी खरेदी केल्यामुळे त्यांच्यावर बेघर होण्याची वेळ आली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी उक्त बांधकाम व्यावसायिकासह मुळशी तालुक्यातील दोन उप-निबंधकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाची तसेच खरेदीदारांची फसवणूक करणाऱ्या उक्त बांधकाम व्यावसायिकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) हिंजवडी, तालुका मुळशी, जिल्हा पुणे येथील सर्व्हे नंबर २२०, हिस्सा नंबर १ व ५/५ मधील ०-८३ हेक्टर मिळकत अंमलबजावणी संचालनालयाने (इनफोर्समेंट डायरेक्टरेट) जप्त केलेली आहे हे माहीत असून सुद्धा आरोपींनी दुय्यम निबंधक कार्यालय मुळशी २ व दुय्यम निबंधक कार्यालय, पौड, मुळशी २ यांचेशी संगनमत करून स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता सदरची मिळकत दोन वेळा दोन वेगवेगळ्या दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये नोंदणी करून विकली आहे. सदर मिळकतीवर हिंदवी स्वराज्य कॉर्पोरेशन प्रा.ली. कंपनी व त्या कंपनीचे डायरेक्टर याने नमुद मिळकत ही ई.डी. ने जप्त केलेली आहे हे माहीत असतानाही सदर मिळकतीवर तीन इमारती बांधून त्यामधील सदनिका ग्राहकांना विकून ग्राहकांची व शासनाची फसवणूक केली आहे , अशा तक्रारीवरून हिंजवडी पोलीस स्टेशन येथे ६ आरोपी, साहील रिअॅल्टर्स व हिंदवी स्वराज कॉर्पोरेशन प्रा.ली. यांचेविरूद्ध गुन्हा क्र. ३०/२०१८ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ३४ सह लाच लुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ चे कलम १३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासनाच्या दूध खरेदी दराप्रमाणे दर न देणाऱ्या खाजगी दूध संघाना नोटीसा पाठविल्याबाबत

**(६७) * १०५३७१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दूध खरेदी दरात वाढ करणेबाबत निर्देश देऊनही, त्याचे पालन न करणाऱ्या ५० खासगी सहकारी दूध संघांना प्राप्त तक्रारीनुसार दिनांक २५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास नोटीसा पाठविण्यात आल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने दिनांक २१ जून, २०१७ रोजी परिपत्रक काढून शेतकऱ्यांना ३.५ फॅट व ८.५ एस.एन.एफ. इतक्या गुणवत्तेच्या दूधाला प्रतिलिटर २७ रुपये भाव देणे बंधनकारक केले असतानाही प्रतिलिटर १८ रुपये भाव देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दूधाचा रास्त उत्पादन खर्च विचारात घेता गायीच्या दूधाला किमान ५०/- रुपये व म्हशीच्या दूधाला ६५/- रुपये प्रतिलिटर भाव मिळावा अशी मागणी दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने मा.दुग्धविकास मंत्री यांचेकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दूधाला योग्य भाव देण्याबाबत व खासगी दूध संघाच्या मनमानीला आळा घालण्यासाठी आणि उत्पादकांच्या होत असलेल्या पिळवणूकीवर नियंत्रण आणून खासगी संघांना राज्य सरकारच्या कायद्याच्या कार्यक्षेत्रात आणण्यासाठी नवीन धोरण राबविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय, शासनाच्या दूध खरेदी दराप्रमाणे दूध खरेदी दर न देणा-या ३८ जिल्हा/तालुका सहकारी संघांना व महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या.,(महानंद) या महासंघास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६० चे कलम ७९(अ)(३) अन्वये नोटिस देण्यात आलेली आहे.

(२) होय, शासनाने दि.१९ जून, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेले गाय व म्हैस दूधाचे खरेदी दर सहकारी संघाना बंधनकारक केलेले असतांनाही काही सहकारी दूध संघ शासनाने निर्धारित केलेल्या दरापेक्षा कमी दराने दूध खरेदी करीत आहेत तसेच खाजगी दूध व्यवसाय क्षेत्रावर सद्यस्थितीत दूध खरेदी दराचे कायदेशिर बंधन नसल्याने ते त्यांच्या स्तरावर दूध खरेदी-विक्रीचे दर निश्चित करतात. परिणामी दूध खरेदी दरात तफावत निर्माण होते.

(३) होय.

(४) व (५) शासनाने सातत्याने शेतकऱ्यांचे हित जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून दि.१९/०६/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनाने, शासकीय दूध योजनेच्या दूध खरेदी दरात रु.३/- इतकी दरवाढ दि.२१/०६/२०१७ पासून लागू केली आहे. सदर दूध दरवाढ बाजारभावाचा आढावा व शेतकऱ्यांचे हित या दोन्ही गोष्टी विचारात घेऊनच करण्यात आलेल्या आहेत.

खाजगी दुग्धव्यवसाय क्षेत्रावर कायदेशिर बंधन आणण्याच्या दृष्टीने शुगर प्राईज कंट्रोल ॲक्टच्या धर्तीवर दूधाकरिता कायदा आणण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) महानगरपालिकेत समाविष्ट असलेल्या २९ गावांमध्ये गावठाण भुमापन न केल्याबाबत

**(६८) * १०५१७९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) महानगरपालिकेत समाविष्ट असलेल्या २९ गावांमध्ये भूमी अभिलेख विभागाकडून गावठाण भुमापन न केल्यामुळे या गावातील घरांना मालमत्ता कार्ड व दुरूस्तीसाठी महानगरपालिकेमार्फत परवानगी मिळत नसल्याचे तसेच गावालगतच्या गावठाणांवर मालकी कोणाची असा प्रश्न निर्माण होऊन विकासकामांत अडथळे येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावांचे गावठान भुमापन करण्याबाबत पनवेल महानगरपालिकेने मागणी करून १ वर्ष झाले असतानाही भूमी अभिलेख विभागाने अद्याप गावठान भुमापन केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त २९ गावांचे तातडीने गावठान भुमापन करण्याबाबत तसेच यास टाळाटाळ करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) प्रस्तुत प्रकरणी पनवेल महानगरपालिकेत समाविष्ट असलेल्या २९ गावांपैकी ८ गावांचे गावठाण भूमापन (सिटी सर्व्हे) मोजणीचे काम पूर्ण झाले असून सदरची गावे परीरक्षणास घेण्यात आलेली आहेत. नगर भूमापन कामी आवश्यक असणारी महानगरपालिका हद्दीतील गावठाण क्षेत्र व मिळकतींची गाव निहाय संख्या

याबाबतची माहिती मार्च, २०१७ मध्ये भूमि अभिलेख विभागास प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने उर्वरीत गावांच्या कामाबाबत लागणारा खर्च रु. १ कोटी ९० लाख एवढी रक्कम पनवेल महानगरपालिकेला फेब्रुवारी, २०१८ मध्ये भूमी अभिलेख विभागाकडून कळविण्यात आलेली असून सदरचा खर्च अदा करण्यास संमती असल्याचा ठराव मंजूर करुन घेण्याबाबतही पनवेल महानगरपालिकेस कळविण्यात आलेले आहे. पनवेल महानगरपालिकेकडून आवश्यक तो ठराव प्राप्त झाल्यानंतर नगर भूमापनाबाबत शासन पुढील निर्णय घेईल.

प्रस्तुत प्रकरणात झालेल्या विलंबाबाबत जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांना उप अधीक्षक भूमि अभिलेख, पनवेल यांच्याकडून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

-----------------

## नऱ्हे (ता.हवेली, जि.पुणे) येथील बँक ऑफ महाराष्ट्र ते पारी कंपनी चौक या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(६९) * १०४८८९ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नऱ्हे (ता.हवेली, जि.पुणे) येथील बँक ऑफ महाराष्ट्र ते पारी कंपनी चौक या रस्त्याची दुरवस्था झाली असल्यामुळे रस्त्यावर सतत अपघात होत असून त्यात अनेक नागरिक जखमी होत असल्याचे तसेच येथील स्मशानभूमी ते भूमकर नगर (काळूबाई मंदिर) पर्यंतचा सर्व्हिस रस्ता ९० मीटर वरून १०० मीटर वाढविण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळाली असताना सदर काम अद्याप प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोन्ही रस्त्यांच्या कामाबाबत संबंधिताकडे वेळोवेळी पत्रव्यवहार व पाठपुरावा करूनसुद्धा कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार नऱ्हे येथील बँक ऑफ महाराष्ट्र ते पारी कंपनी चौक या रस्त्याची दुरुस्ती करून स्मशानभूमी ते भूमकर नगर या रस्त्याचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अ) नऱ्हे येथील बॅक ऑफ महाराष्ट्र ते पारी कंपनी चौक हा रस्ता खराब आहे. परंतु त्यावर अपघात झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

ब) तसेच स्मशानभुमी ते भुमकर नगर (काळुबाई मंदिर) पर्यतचा सर्व्हिस रस्ता हा बेंगलोर-मुंबई (रा.मा.क्र.४ ) चा बाह्यवळण मार्गाचा सेवा रस्ता आहे. सदर रस्ता भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्या अखत्यारीत असून सदरचे काम मंजूर आहे.
(२) नऱ्हे येथील बॅक ऑफ महाराष्ट्र ते पारी कंपनी चौक या रस्त्याबाबत जिल्हा परिषद पुणेकडे कोणताही पत्रव्यवहार झाल्याचे आढळून येत नाही.
(३) प्रश्न भाग क्र.१ च्या उत्तरातील "अ" येथील रस्त्याची जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली आहे.
(४) नऱ्हे येथील बँक ऑफ महाराष्ट्र ते पारी कंपनी चौक हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र ४२९ असून या रस्त्याची लांबी ७५० मीटर आहे. मध्यभागी २५० मी. कॉक्रीटचा रस्ता असून दोन्ही बाजूस डांबरी रस्ता आहे. पारी कंपनी चौकाचा रस्ता हा इतर जिल्हा मार्ग क्र. १२९ चा भाग रस्ता असून डांबरी आहे. या रस्त्याची लांबी २०० मी. आहे. याप्रमाणे या रस्त्याची एकूण लांबी ९५० मी. आहे. सदर रस्त्यावरील जड वाहतुकीमुळे डांबरी पृष्ठभाग खराब झालेला आहे.

या खराब रस्त्याच्या दुरुस्तीचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे. सदर रस्त्यावर खड्डे भरण्याचे काम जिल्हा परिषदेमार्फत मंजूर करण्यात आले आहे.

स्मशानभूमी ते भूमकर नगर सेवा रस्ता भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्यामार्फत पूर्ण करण्यात येणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.